दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक ३०७ । शुक्रवार २१ ऑगस्ट २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## महात्मा ज्योतिबा फुले समग्र वाङ्मय ग्रंथाचा सात भाषांमध्ये अनुवाद

**मुंबई :** महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनातर्फे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या समग्र वाङ्मय ग्रंथ हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली आणि गोर बंजारा या सात भाषांमध्ये अनुवाद करण्यात येईल, अशी घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली आणि गोर बंजारा या भाषांसाठी साहित्य अकादमी कार्यरत आहेत. या साहित्य अकादमींच्या माध्यमातून साहित्यिक आदान-प्रदानाला प्रोत्साहन देण्यासाठी आज प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे एक दिवशीय अनुवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. मराठीतील उत्कृष्ट साहित्यकृतींचा विविध भाषांमध्ये तसेच विविध भाषांतील उत्कृष्ट साहित्यकृतींचा मराठीत अनुवाद करण्यास प्रोत्साहन देणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे.

# साखर ७,५०० रुपये क्किंटल

## भाववाढीने ऊस उत्पादकांच्या आशा पल्लवित!

- किरकोळ बाजारात साखर ८० रुपयांपार
- साखरेच्या वाढत्या दराचा लाभ ऊस उत्पादकांना मिळणार का?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** देशांतर्गत बाजारात साखरेचा दर ७ हजार ५०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत पोहोचला असून, किरकोळ बाजारात साखरेचा भाव ८० रुपये किलोच्या पुढे गेला आहे. साखरेच्या दरातील या वाढीमुळे ग्राहकांच्या खिशावर परिणाम होत असला, तरी दुसरीकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने ही दरवाढ महत्त्वाची ठरण्याची शक्यता आहे. साखरेला बाजारात चांगला भाव मिळत असताना त्याचा थेट आणि योग्य लाभ ऊस उत्पादकांच्या उसाच्या दरात प्रतिबिंबित झाला पाहिजे, अशी शेतकरी वर्गाची अपेक्षा आहे.

साखरेच्या दरात झालेली वाढ ही केवळ बाजारातील भाववाढ म्हणून न पाहता, ऊस उत्पादकांच्या उत्पादनाला योग्य मोबदला मिळण्याच्या दृष्टीने महत्त्वाची संधी मानली जात आहे. साखरेचा बाजारभाव वाढत असताना साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती सुधारत असेल, तर त्याचा परिणाम शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अंतिम ऊसदरावरही झाला पाहिजे, अशी मागणी होत आहे.

साखरेचा दर ७,५०० रुपये क्विंटलपर्यंत पोहोचल्याने साखर कारखान्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे एफआरपीपेक्षा अधिक दर देण्याची कारखान्यांची क्षमता वाढू शकते, असा शेतकरी वर्गाचा दावा आहे. साखरेच्या विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा योग्य हिस्सा ऊस उत्पादक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरवर्षी उत्पादन खर्च, खतांचे वाढते दर, मजुरी, सिंचन, औषधे आणि वाहतूक खर्च वाढत असताना उसाला मिळणारा दर हा शेतकऱ्यांच्या आर्थिक गणितासाठी निर्णायक ठरतो. त्यामुळे साखरेच्या बाजारभावातील वाढीचा फायदा केवळ साखर कारखान्यांना किंवा व्यापाऱ्यांना न होता ऊस उत्पादकांच्या खात्यातही दिसला पाहिजे, अशी भूमिका शेतकरी संघटनांकडून घेतली जाऊ शकते.

२०२५-२६ च्या हंगामात देशातील साखरेचा वापर उत्पादनाच्या तुलनेत अधिक झाल्याने कारखान्यांकडील उपलब्ध साठा कमी झाल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे. परिणामी बाजारातील पुरवठ्यावर दबाव निर्माण झाला असून साखरेच्या दरात वाढ होत आहे. सरकारने उत्पादनाच्या अंदाजानुसार साखर निर्यातीला परवानगी दिली होती. निर्यातबंदीपूर्वीही मोठ्या प्रमाणात साखर निर्यात झाल्याने देशांतर्गत उपलब्ध साठ्यावर परिणाम झाल्याचे बाजारातील जाणकारांचे मत आहे. वाढते दर नियंत्रणात आणण्यासाठी सरकार साखर आयातीचाही विचार करत असल्याची चर्चा आहे. साखरेचा भाव वाढला, तर उसाचा अंतिम दरही त्यानुसार वाढवा; वाढत्या उत्पादन खर्चाचा विचार करून ऊस उत्पादकांना न्याय्य मोबदला द्या!

साखरेचा बाजारभाव ७,५०० रुपये क्विंटलवर पोहोचला असताना आता ऊस उत्पादकांच्या नजरा साखर कारखान्यांकडून मिळणाऱ्या अंतिम ऊसदराकडे लागल्या आहेत.



### शेतकऱ्यांना ‘गोडवा’ मिळणार का?

साखरेचा भाव वाढला की त्याचा फायदा ग्राहकांना कमी आणि शेतकऱ्यांना अधिक मिळायला हवा, असे समीकरण मात्र प्रत्यक्षात कितपत उतरते, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. साखरेचा बाजारभाव, कारखान्यांचे उत्पन्न आणि ऊस उत्पादकांना मिळणारा अंतिम ऊसदर यांच्यात पारदर्शक संबंध असणे गरजेचे आहे. साखरेच्या वाढलेल्या दरामुळे कारखान्यांना मिळणाऱ्या अतिरिक्त उत्पन्नातून शेतकऱ्यांना योग्य हिस्सा मिळाल्यासच या दरवाढीचा खरा फायदा ऊस उत्पादकांना होईल. अन्यथा साखर ८० रुपये किलोवर पोहोचूनही ऊस उत्पादकांच्या पदरात अपेक्षित दर न पडल्यास ही दरवाढ शेतकऱ्यांसाठी निरर्थक ठरेल.

# राज्यात सुट्ट्या खाद्यतेलाच्या विक्रीवर बंदी !

## दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर १० लाखांपर्यंत दंड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आता तुकाराम मुंढे यांनी आपला मोर्चा हा तेल विक्रेत्यांकडे वळवला आहे. सेव्ह फूड,सेव्ह ड्रग, सेव्ह महाराष्ट्र मोहिमेअंतर्गत एडिबलं ऑईलबद्दल हा आदेश दिला.

खाद्य तेलावर आता काम केले जाईल, राज्यात सुट्ट्या तेलावर बंदीचे आदेश तुकाराम मुंढे यांनी दिले आहेत. खाद्यतेलाच्या वापरांचे उल्लंघन केल्यास आता ७ वर्षांची शिक्षा होऊ शकते.तर यासोबतच दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर १० लाखापर्यंत दंड लागू शकतो असा ईशारा मुंडे यांनी दिला आहे.

तुकाराम मुंढे म्हणाले की, नोंदणी न केलेल्या खाद्य तेल कंपन्या आम्हाला मिळाल्या



आहेत. खाद्य तेलात भेसळ केली जाते. मोहरी तेलामध्ये अनधिकृत मिश्रण केले जाते ज्याची परवानगी नाही. खाद्यतेलाची विक्री सुट्ट्या स्वरूपात करता येत नाही हा नियम अगोदरपासून आहे. असे सांगतानाच किरकोळ विक्रेत्यांनी सुद्धा सुट्टे तेल विक्री करू नये, असे आवाहन तुकाराम मुंढे यांनी केले आहे. मोहरीचे तेल १०० टक्के मोहरीचे (पान ४ वर)

# मंदिरात प्रवेश देवीचे दर्शन अन् दानपेट्यांवर डल्ला..!

## एकाच रात्री तीन मंदिरात चोरी

- सीसीटीव्हीत पाच चोरटे कैद
- ब वर्ग तीर्थक्षेत्र निघोज-टाकळी हाजी परिसरात खळबळ...

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** मंदिरात प्रवेश देवीचे दर्शन अन् त्यानंतर दानपेट्यांवर डल्ला! एकाच रात्री पारनेर तालुक्यातील राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान, ब वर्ग तीर्थक्षेत्र, श्रीक्षेत्र निघोज व वडगाव गुंड तसेच शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथील मंदिरांना चोरट्यांनी लक्ष्य केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

निघोज येथील मळगंगा देवी मंदिरातील चोरीचा थरारक प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, तब्बल पाच चोरटे या फुटेजमध्ये दिसत आहेत.

चोरीची सुरुवात रात्री सुमारे एक वाजता वडगाव गुंड येथील भैरवनाथ मंदिरापासून झाल्याचे समोर आले आहे. चोरट्यांनी मंदिरातील दानपेटी फोडली. त्यानंतर शिरूर-पारनेर तालुक्याच्या सरहद्दीवरील टाकळी हाजी येथील मळगंगा मंदिरातील दानपेटी फोडण्यात आली. ही दानपेटी अनेक दिवसांपासून उघडण्यात आली नसल्याने त्यामध्ये मोठी रक्कम जमा असण्याची शक्यता व्यक्त होत आहे. (पान ४ वर)

### ‘चोर पकडा, अन्यथा आंदोलन’ ` ग्रामस्थांचा इशारा

निघोज येथील मळगंगा देवी मंदिरात वारंवार चोरी होत असल्याने ग्रामस्थांमध्ये संताप आहे. मंदिराच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक नेमण्याची मागणी करण्यात आली आहे. चोरीचा तपास लवकर न लागल्यास आंदोलन करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.






१) श्रीक्षेत्र निघोज कुंडमाऊली येथील मंदिरात चोरी करताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेले चोरटे.
२) घटनास्थळी पाहणी करताना पोलिस पथक.
– छाया : दत्ता गाडगे

## १७ सप्टेंबर रोजी मोदींचा पंतप्रधान म्हणून शेवटचा वाढदिवस?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय भवितव्याबाबत शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी खळबळजनक दावा करताना १७ सप्टेंबर रोजी पंतप्रधानपदी असताना नरेंद्र मोदींचा हा शेवटचा वाढदिवस असेल, असे म्हटले आहे.




काँग्रेस कार्यकारिणी समितीच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेण्याबाबत चर्चा झाल्याचे वृत्त आहे. या पार्श्वभूमीवर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोदी येत्या ६ ते ८ महिन्यांत पंतप्रधानपदी राहणार नाहीत, असे बैठकीत म्हटल्याची माहिती समोर आली आहे.

राऊत म्हणाले की, राहुल गांधी यांच्या मताशी माझेही या विषयावर एकमत आहे. गेल्या काही महिन्यांपासून मीही मोदी आपला कार्यकाळ पूर्ण करणार नसल्याचे सांगत आहे. १७ सप्टेंबरनंतर या गोष्टींचा उलगडा होईल, असा दावा त्यांनी केला. मोदींचे पंतप्रधान म्हणून लाल किल्ल्यावरील शेवटचे भाषण असल्याचा दावाही यापूर्वी केल्याचे राऊत यांनी सांगितले.

## खरातवाडीत पैशांच्या वादातून थरार
# वृद्धेच्या अंगावर घातला ट्रॅक्टर

### महिलेचा विनयभंग करून मुलास मारहाण : तिघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील खरातवाडी येथे जुन्या पैशांच्या वादातून एका कुटुंबावर हल्ला करून महिलेचा विनयभंग, अल्पवयीन मुलास मारहाण तसेच ६५ वर्षीय वृद्ध महिलेच्या अंगावर ट्रॅक्टर घालून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे बेलवंडी परिसरासह श्रीगोंदा तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली



सविस्तर माहिती अशी की, ताई कैलास जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १८ ऑगस्ट रोजी दुपारी आरोपी सिद्धार्थ दीपक ईथापे याने घरात घुसून पैशांची मागणी करत त्यांच्या मुलास मारहाण केली व मोटारसायकल जबरदस्तीने घेऊन गेला. त्यानंतर रात्री सिद्धार्थ, साहिल व दीपक ईथापे हे तिघे ट्रॅक्टर घेऊन पुन्हा घरासमोर आले. यावेळी दीपक (पान ४ वर)

## उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना मिळणार महिन्याला २००० रुपयांचा पॉकेटमनी?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी आर्थिक मदत आणि आत्मविश्वास वाढवण्याच्या दृष्टिकोनातून दोन हजार रुपये पॉकेट मनी उपलब्ध करून देण्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा प्रयत्न आहे. राज्यातील ज्या मुली उच्च शिक्षण घेत आहेत, अशा विद्यार्थिनींना आर्थिक मदत मिळावी त्यासोबतच शिक्षण घेत असताना त्यांचा आत्मविश्वास वाढवा या दृष्टिकोनातून राज्य सरकार प्रयत्नशील आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना पॉकेट मनी म्हणून कमवा आणि शिका या धर्तीवर महिन्याला दोन हजार रुपये देण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा विचार सुरू आहे.

यासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभाग विद्यापीठ त्यासोबतच मोठे महाविद्यालय यांच्यासोबत चर्चा करून सीएसआरच्या माध्यमातून अशा प्रकारे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना दरमहा दोन हजार रुपये घेण्याचा विचार करत आहे. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काल (बुधवारी, ता २०) मुंबईतील काही (पान ४ वर)

# उमरडा गोवंश, माडग्याळ मेंढीला स्वतंत्र प्रजातीचा दर्जा

## महाराष्ट्राच्या पशुवैभवाला राष्ट्रीय मान्यता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महाराष्ट्रातील पारंपरिक पशुधनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय झाला असून, उमरडा या स्थानिक गाईला स्वतंत्र देशी गोवंश, तर माडग्याळ मेंढीला स्वतंत्र व अधिकृत प्रजाती (ब्रीड) म्हणून राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. या मान्यतेमुळे दोन्ही प्रजातींचे संवर्धन, जतन, शास्त्रीय पद्धतीने प्रजनन आणि आनुवंशिक सुधारणा कार्यक्रमांना मोठी चालना मिळणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्यूरो, करनाल यांच्याकडे पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने ही नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली. भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्यूरोचे संचालक डॉ. एन. एच. मोहन यांनी याबाबत अधिकृत पत्र जारी केले आहे. ७ ऑगस्ट रोजी झालेल्या आयसीएआर ब्रीड रजिस्ट्रेशन कमिटीच्या १४ व्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

### उमरडा गोवंशाची वैशिष्ट्ये :

अमरावती जिल्ह्याच्या १९१० च्या ब्रिटिशकालीन गॅझेटमधील नोंदींवरून उमरडा गोवंश गेल्या शतकापासून अस्तित्वात असल्याचे दिसून येते. पश्चिम विदर्भातील यवतमाळ, अमरावती आणि वाशीम जिल्ह्यांमध्ये हा गोवंश आढळतो. उंच अंगकाठी आणि पांढरा शुभ्र रंग ही त्याची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. वाशीम जिल्ह्यातील उंबर्डा बाजार या पशुधन बाजारपेठेवरून ‘उमरडा’ हे नाव प्रचलित झाले. दिग्रस तालुक्यामुळे त्याला ‘दिग्रस’, तर बंजारा समाजाच्या पारंपरिक पालनामुळे ‘बंजारा गोवंश’ असेही संबोधले जाते.

### माडग्याळ मेंढीची वैशिष्ट्ये :

माडग्याळ मेंढी प्रामुख्याने धनगर आणि रामोशी समाजातील मेंढपाळांकडून पाळली जाते. विषम हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता, रोगप्रतिकारशक्ती, जलद वजनवाढ, कोकरांच्या जगण्याचे प्रमाण, चांगली मातृत्व प्रवृत्ती आणि मटण उत्पादनासाठी उपयुक्तता यामुळे या मेंढीला मोठी मागणी आहे. सांगली जिल्ह्यातील माडग्याळ व सनमाडी परिसरात सुमारे शंभर वर्षांपूर्वी निवड पैदास पद्धतीने या प्रजातीचा विकास झाल्याचे सांगितले जाते. मोठी अंगकाठी आणि मटणासाठी उपयुक्तता ही तिची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.
या राष्ट्रीय मान्यतेमुळे महाराष्ट्राच्या स्थानिक पशुधनाला स्वतंत्र ओळख मिळाली असून, पशुपालक, संशोधक आणि संबंधित संस्थांच्या माध्यमातून या प्रजातींच्या संवर्धनाला नव्या दिशेने गती मिळण्याची अपेक्षा आहे.





पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्तावाचा पाठपुरावा करण्यात आला. पुण्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळ, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर तसेच कर्नाटकातील कृषी व पशुवैद्यकीय विद्यापीठातील तज्ज्ञांचे संशोधन व तांत्रिक योगदान या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण ठरले.पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी ही मान्यता महाराष्ट्रातील पशुपालकांसाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगितले. पारंपरिक पशुधनाच्या संवर्धनाला यामुळे संस्थात्मक व शास्त्रीय बळ मिळणार असून, उत्पादकता आणि आनुवंशिक गुणवत्ता सुधारण्यासाठी शासन (पान ४ वर)

# कृषी निर्यात : उत्पादन वाढले, पण धोरणांचा दर्जा कधी वाढणार?

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

मएकीकडे भारतीय शेती उत्पादनाचे प्रमाण वाढत आहे, तर दुसरीकडे जागतिक बाजारपेठेत भारतीय शेतीमालाच्या गुणवत्तेवर सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. रसायनांचे उर्वरित अंश, निर्यात नियमांचे उल्लंघन, प्रक्रिया व निर्जंतुकीकरणातील त्रुटी अशी कारणे पुढे करून विविध देश भारतीय शेतीमालाच्या आयातीवर निर्बंध घालत आहेत. जागतिक बाजारपेठ काबीज करण्याची क्षमता असतानाही ठोस धोरण, धोरणातील सातत्य आणि प्रभावी व्यापारी कूटनीतीच्या अभावामुळे भारतीय कृषी निर्यात अजूनही आखाती देशांच्या पुढे मोठ्या प्रमाणावर विस्तारलेली नाही, ही चिंतेची बाब आहे.

एप्रिल २०२४ मध्ये हाँगकाँग आणि सिंगापूरने भारतीय मसाल्यांच्या नमुन्यांमध्ये 'इथिलीन ऑक्साईड' आढळल्याचे सांगत आयातीवर निर्बंध घातले. त्यानंतर अमेरिका आणि युरोपियन संघानेही तपासणी वाढवली. जपानने भारतीय आंब्यांच्या प्रक्रिया केंद्रांतील कीड नियंत्रण आणि निर्जंतुकीकरण प्रक्रियेतील त्रुटींचा हवाला देत आंबा आयातीवर बंदी घातली. चीनने भारतीय तांदूळ जनुकीय सुधारित असल्याचा दावा करून काही निर्यात परवाने रद्द केले. या घटना स्वतंत्रपणे पाहिल्यास किरकोळ वाटू शकतात; मात्र जागतिक बाजारपेठेत त्यातून भारताच्या विश्वासार्हतेवर परिणाम होतो.

भारतीय कृषी निर्यात २०१४-१५ मधील सुमारे ३२.०९ अब्ज डॉलरवरून २०२५-२६ मध्ये ५२.५५ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचल्याची आकडेवारी सरकारकडून मांडली जाते. मात्र निर्यातीचा आकडा वाढणे आणि निर्यात व्यवस्था सक्षम होणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. आखाती संघर्षामुळे जहाजवाहतूक, वातानुकूलित कंटेनरची उपलब्धता, परदेशी बंदरांवरील विलंब आणि वाढलेला वाहतूक खर्च यामुळे निर्यातदार अडचणीत आहेत. वाहतुकीचा कालावधी वाढल्याने नाशवंत शेतीमालाच्या निर्यातीवर त्याचा थेट परिणाम होतो. या समस्यांवर दीर्घकालीन पर्याय निर्माण करण्याची गरज आहे.याहून गंभीर प्रश्न आहे तो धोरणातील सातत्याचा. देशातील १४० कोटींहून अधिक जनतेची अन्नसुरक्षा ही सर्वोच्च प्राथमिकता असली तरी त्यासाठी निर्यातदारांचा विश्वास गमावणे योग्य नाही. गहू, साखर, तांदूळ यांसारख्या वस्तूंच्या निर्यात धोरणात वारंवार बदल झाल्याने भारताबाबत आंतरराष्ट्रीय खरेदीदारांमध्ये अनिश्चितता निर्माण होते. आज करार करून उद्या निर्यातबंदी होणार असेल, तर जागतिक व्यापारी पर्यायी पुरवठादार शोधणारच. त्यामुळे भारतीय शेतीमालाची आंतरराष्ट्रीय पत आणि दीर्घकालीन बाजारपेठ दोन्ही धोक्यात येतात.

भारत तांदूळ, गहू, मका, तृणधान्ये, द्राक्षे, डाळिंब, केळी आणि आंबा उत्पादनात आघाडीवर आहे. मात्र उत्पादनाच्या प्रमाणाइतकेच गुणवत्तेला महत्त्व देण्याची वेळ आली आहे. रसायनांच्या उर्वरित अंशाचा प्रश्न हा केवळ निर्यातीपुरता मर्यादित नाही. तो देशातील ग्राहकांच्या आरोग्याशीही संबंधित आहे. शेतकऱ्यांना कोणत्या पिकावर कोणते रसायन, किती प्रमाणात आणि कापणीपूर्वी किती दिवस आधी वापरावे, याबाबत शास्त्रीय आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन मिळाले पाहिजे. कृषी विद्यापीठे, संशोधन संस्था, कृषी विभाग आणि शेतकरी यांच्यातील दुवा अधिक मजबूत झाला पाहिजे.

महाराष्ट्रातील द्राक्ष उत्पादकांनी मात्र स्वतःच्या अनुभवातून जागतिक बाजारपेठेची शिस्त आत्मसात केली. अमेरिका आणि युरोपातील कठोर निकष समजून घेत त्यांनी निर्यातक्षम उत्पादनाची स्वतंत्र पद्धत विकसित केली. हाच अनुभव डाळिंब, केळी, संत्री, मोसंबी, पेरू, चिकू आणि इतर फळपिकांसाठी व्यापकपणे वापरता आला पाहिजे. आज भारतीय डाळिंबाच्या निर्यातीपैकी मोठा हिस्सा बांगलादेशावर अवलंबून आहे. आखाताच्या पलीकडे बाजारपेठ विस्तारण्याची क्षमता असूनही रसायनांचे अंश, दर्जा आणि निर्यात खर्च यामुळे आपण मागे पडत आहोत, हे आत्मपरीक्षणाचे कारण आहे.

शेती उत्पादन वाढले की शेतकऱ्याचे उत्पन्न वाढले पाहिजे, हा साधा नियम आहे. परंतु भारतात उलटेच घडते. मुबलक उत्पादन झाले की दर कोसळतात आणि सीताफळ, पेरू, डाळिंब, कांदा यांसारखा शेतीमाल बांधावर फेकून देण्याची वेळ शेतकऱ्यांवर येते. बाजारपेठेची गरज, ग्राहकांची मागणी, निर्यातीचे निकष आणि भविष्यातील संधी यांचा अभ्यास करून उत्पादनाचे नियोजन करण्याची गरज आहे. केवळ मोबाईल ॲपवर शेतकऱ्यांची नोंदणी वाढवून कृषी प्रश्न सुटणार नाहीत.

भारतीय कृषी निर्यातीसमोरची खरी गरज आहे ती उत्पादकापासून ग्राहकापर्यंत सक्षम आणि विश्वासार्ह साखळीची. शेतात गुणवत्तापूर्ण उत्पादन, योग्य प्रक्रिया, शीतसाखळी, प्रयोगशाळा तपासणी, प्रमाणपत्रे, वाहतूक, बंदर सुविधा आणि स्थिर निर्यात धोरणया सर्वांचा एकत्रित विचार झाला पाहिजे. परदेशी देश भारतीय शेतीमालावर आक्षेप घेत असतील, तर त्याला केवळ व्यापारी कट म्हणून न पाहता आवश्यक तेथे दोष दुरुस्त करण्याची तयारीही ठेवावी लागेल; आणि अन्यायकारक निर्बंध असतील तर सरकारने आंतरराष्ट्रीय पातळीवर ठामपणे बाजू मांडली पाहिजे.

शेतकऱ्याने विक्रमी उत्पादन घेतले तर त्याचा सन्मान व्हायला हवा. मात्र आपल्या व्यवस्थेत उत्पादन वाढले की बाजारभाव कोसळतात आणि तोच शेतकरी रस्त्यावर उतरला की त्याच्याकडे संशयाने पाहिले जाते. ही परिस्थिती बदलायची असेल तर कृषी धोरणाला निव्वळ उत्पादनवाढीच्या चौकटीतून बाहेर काढून गुणवत्ता, बाजारपेठ आणि निर्यातविश्वास या तीन आधारस्तंभांवर उभे करावे लागेल. भारताकडे जगाची भूक भागवण्याची क्षमता निश्चितच आहे; प्रश्न एवढाच आहेत्या क्षमतेला जागतिक बाजारपेठेतील विश्वासार्हता आणि शेतकऱ्याला न्याय्य मोबदला देण्याची ताकद आपल्या धोरणांमध्ये कधी निर्माण होणार?

# लायन्स समता ब्लड सेंटरमुळे जिल्ह्यातील रुग्णांना मोठा आधार : ना. राधाकृष्ण विखे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : रक्ताची उपलब्धता ही रुग्णसेवेतील अत्यंत महत्त्वाची बाब असून अपघात, शस्त्रक्रिया, प्रसूती तसेच गंभीर आजारांमध्ये वेळेत रक्त मिळणे आवश्यक असते. ही गरज लक्षात घेऊन कोपरगाव शहरात सुरू करण्यात आलेले 'लायन्स समता ब्लड सेंटर' अहिल्यानगर जिल्ह्यातील गरजू रुग्णांसाठी मोठा आधार ठरेल, असा विश्वास राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी व्यक्त केला.



लायन्स क्लब ऑफ कोपरगाव व समता चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने निवारा परिसरात उभारण्यात आलेल्या या रक्तकेंद्राचे उद्घाटन विखे पाटील यांच्या हस्ते व समता चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. नाशिक येथील समता ब्लड सेंटर व देवाज हेल्थ अँड डेव्हलपमेंट फाउंडेशनचे सहकार्य या उपक्रमाला लाभणार आहे.

यावेळी काका कोयटे यांनी रक्तदानाबरोबरच रक्ताचे सुरक्षित संकलन, साठवणूक व गरजू रुग्णांना वेळेत उपलब्धता यावर भर दिला. यापूर्वी समता परिवाराच्या माध्यमातून नाशिक येथील रक्तपेढीस सुमारे पाच हजार रक्तपिशव्या उपलब्ध करून देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांनी नियमित रक्तदान करून या उपक्रमाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

विधान परिषद सदस्य विवेक कोल्हे यांनीही उपक्रमाचे कौतुक केले. लायन्स इंटरनॅशनलचे डायरेक्टर एम.जे.एफ. ला. राज मुच्छाल यांनी हे देशातील ५२ वे लायन्स ब्लड सेंटर असल्याचे सांगितले.

या रक्तकेंद्रात अत्याधुनिक मशिनरीच्या साहाय्याने रक्तसंकलन, साठवणूक व रक्तघटक निर्मितीची सुविधा उपलब्ध आहे. सुमारे चार हजार रक्तपिशव्या साठविण्याची क्षमता असून दुर्मिळ रक्तगट उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. कोपरगाव परिसरातील गरजू रुग्णांसाठी दरमहा ५० रक्तपिशव्या मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

विशेष म्हणजे कुलदीप कोयटे याने वयाची १८ वर्षे पूर्ण होताच प्रथमच रक्तदान करून तरुणांसमोर आदर्श ठेवला. कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, लायन्स क्लबचे पदाधिकारी, समता ट्रस्टचे सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ब्राम्हणगावात रेशीम शेतकऱ्यांना प्रशिक्षण 'मेरा रेशम मेरा अभिमान २.0' अभियानातून तांत्रिक व आर्थिक सक्षमीकरणावर भर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**ब्राम्हणगाव** : 'मेरा रेशम मेरा अभिमान (चठचअ २.०)' अभियानांतर्गत कोपरगाव तालुक्यातील ब्राम्हणगाव येथे रेशीम शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमास केंद्रीय रेशीम मंडळाचे शास्त्रज्ञ, राज्य रेशीम विभागाचे अधिकारी, बँक प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि प्रगतिशील शेतकरी अशा सुमारे ५५ जणांची उपस्थिती होती.जिल्हा रेशीम अधिकारी संदिप एम. आगवणे, केंद्रीय रेशीम मंडळाचे शास्त्रज्ञ डॉ. करण एस. तसेच विविध संस्था व बँक प्रतिनिधींच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी रेशीम कीटक संगोपनगृहाची



स्वच्छता व निर्जंतुकीकरण, रोग नियंत्रण, तुती पिकावरील रसशोषक किडी व माइट्सच्या व्यवस्थापनासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन (खझच्) पद्धती याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. पर्यावरण नियंत्रित संगोपनगृहांमध्ये तापमान व आर्द्रता नियंत्रित ठेवण्याचे महत्त्वही स्पष्ट करण्यात आले. सेंट्रल बँक ऑफ इंडिया व बँक ऑफ महाराष्ट्रच्या प्रतिनिधींनी रेशीम शेतीसाठी उपलब्ध प्रशिक्षण, कर्ज सुविधा व आर्थिक पर्यायांची माहिती दिली. स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून योजनांशी जोडणी व आवश्यक सहाय्य मिळवून देण्याबाबतही चर्चा झाली. प्रशिक्षणादरम्यान शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विविध तांत्रिक अडचणी मांडल्या. शास्त्रज्ञ, अधिकारी, बँका व स्वयंसेवी संस्थांना एकत्र आणणारा हा उपक्रम जिल्ह्यातील रेशीम उद्योगाच्या शाश्वत विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरला.

# अभिजीत पोटे यांच्या वाढदिवसानिमित्त शरणपूर वृद्धाश्रमाला महिनाभराचे किराणा साहित्य

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : शिवसेनेचे युवा नेते अभिजीत दादा पोटे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या मित्रपरिवाराच्या वतीने सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. नेवासा तालुक्यातील रांजणगाव-फत्तेपुर रस्त्यावरील शरणपूर वृद्धाश्रमातील वृद्धांसाठी महिनाभर पुरेल एवढे किराणा साहित्य भेट देण्यात आले. या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी काम करणाऱ्या अभिजीत पोटे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मित्रमंडळाने हा उपक्रम आयोजित केला. श्री क्षेत्र देवगड येथे दर्शन घेऊन मित्रपरिवाराने श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबांकडे पोटे यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली. त्यानंतर गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांचे दर्शन घेऊन मित्रमंडळ शरणपूर वृद्धाश्रमात पोहोचले.

यावेळी वृद्धाश्रमातील वृद्ध माता-पित्यांचे आशीर्वाद घेत अभिष्टचिंतन करण्यात आले. वृद्धाश्रमातील गरजा लक्षात घेऊन आवश्यक किराणा साहित्य देण्यात आले. वाढदिवसाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत केलेला हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी संदेश देणारा ठरला.

वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक संतोष मगर यांनी साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल मित्रपरिवाराचे आभार मानले. उपस्थित वृद्धांनी अभिजीत पोटे यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली.



यावेळी संजय वाघ, मेजर महादेव आढाव, सोमनाथ गर्जे, नाना तागड, केतन देशमुख, युसूफ पठाण, रावसाहेब मगर, भोजन विभाग प्रमुख ज्योती मगर यांच्यासह वृद्धाश्रमातील सर्व वृद्ध माता-पिता उपस्थित होते.दरम्यान, झापवाडी येथे सर्वपक्षीय मित्रपरिवाराच्या वतीने अभिजीत पोटे यांचा सन्मान करण्यात आला.

## माती परीक्षणानुसार खतांचा संतुलित वापर केल्यास शेती फायदेशीर : डॉ. गोरक्ष ससाणे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : माती व पाण्याचे परीक्षण करूनच खत व्यवस्थापन करावे. हवामान बदलानुसार पिकांची निवड करून कृषी विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शेती अधिक फायदेशीर ठरेल, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी केले.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील मृद विज्ञान विभागाच्या वतीने 'शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद कार्यक्रम २०२६' तसेच मृदा आरोग्य पत्रिका वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अध्यक्षस्थानावरून डॉ. ससाणे बोलत होते.




मृद विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. भीमराव कांबळे यांनी मृदा आरोग्य व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. महाराष्ट्रात १७९ माती परीक्षण प्रयोगशाळा असून शेतकऱ्यांनी माती परीक्षण करून खतांचा संतुलित वापर करावा. त्यामुळे उत्पादन खर्चात बचत होऊन जमिनीचे भौतिक, रासायनिक व जैविक गुणधर्म टिकवता येतील, असे त्यांनी सांगितले. रासायनिक खतांसोबत जैविक व सेंद्रिय खतांचा वापर वाढविण्याचे आवाहनही त्यांनी केले.

डॉ. आनंद जाधव यांनी सोयाबीन, ऊस व कपाशीतील खत व्यवस्थापन, डॉ. नंदकुमार भुते यांनी कीड व रोग व्यवस्थापन, डॉ. श्रीगणेश शेळके यांनी क्षारपड जमीन व्यवस्थापन, डॉ. शुभांगी कदम यांनी सोयाबीन उत्पादन तंत्र, तर डॉ. क्रांती पाटील यांनी सिंचन पाणी परीक्षणाबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी जनार्दन आढाव, दिलीप लिपटे, अंबादास बाचकर, रामविलास सोमानी, चौधरी, रेखा कांबळे व बालाजी कांबळे यांना मृदा आरोग्य पत्रिकांचे वितरण करण्यात आले. प्रक्षेत्र भेटीचेही आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास डॉ. विजयकुमार पाटील, डॉ. रितू ठाकरे, डॉ. दत्तात्रय वने यांच्यासह शेतकरी व शास्त्रज्ञ उपस्थित होते. स्वागत डॉ. आनंद जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. क्रांती पाटील, तर आभार डॉ. शुभांगी कदम यांनी मानले.

# शिक्षक देशाचा खरा शिल्पकार : महंत सुनिलगिरी महाराज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : शास्त्रज्ञ, अभियंते, डॉक्टर, राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि सक्षम नागरिक घडविण्याचे कार्य शिक्षक करतात. त्यामुळे शिक्षक हा देशाचा खरा शिल्पकार आहे, असे प्रतिपादन श्रीराम सेवा आश्रमाचे महंत सुनिलगिरीजी महाराज यांनी केले.




कुकाणा ग्रामसेवा मंडळ संचलित पाथरवाला माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा शिक्षक तथा पत्रकार सुनिल पंडित हे २७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्याबद्दल कुकाणा व परिसरातील मित्रमंडळाच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य दादासाहेब वाबळे होते. आमदार विठ्ठलराव लंघे, नेवासा बाजार समितीचे दत्तात्रय खाटीक, काँग्रेसचे युवा जिल्हाध्यक्ष अभिजीत लुणिया आदी उपस्थित होते.

आमदार लंघे यांनी सुनिल पंडित यांनी प्रामाणिकपणे ज्ञानदान करून अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य घडविल्याचे सांगितले. तसेच पत्रकारिता, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचे कौतुक केले.

सुनिल पंडित यांनी शिक्षण संस्थेत काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. विद्यालयाला ज्ञानमंदिर आणि विद्यार्थ्यांना देव मानून पुजारी म्हणून सेवा केल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी जवाहर भंडारी, अभिजीत लुणिया, रेवनाथ काळे, श्रीधर कासार, निकीता पंडित, दादासाहेब वाबळे यांनी मनोगत व्यक्त केले. मित्रमंडळाच्या वतीने सुनिल पंडित यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन भाऊसाहेब सावंत यांनी केले, तर आभार प्रा. लक्ष्मण लोखंडे यांनी मानले.

## हक्काच्या रस्त्यासाठी उंदीरगाव ग्रामस्थांचा सामूहिक उपोषणाचा इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : वॉर्ड क्रमांक १ मधील परदेशी गल्ली, उंदीरगाव आऊटसाईड येथील नागरिकांचा हक्काच्या रस्त्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रस्ता उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामस्थांनी प्रशासनाला निवेदन देत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. परदेशी गल्ली परिसरात ५० पेक्षा अधिक नागरिक वास्तव्यास असून रस्त्याअभावी महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व आजारी व्यक्तींना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शाळा, रोजगार, दवाखाना तसेच अंत्यविधीसाठी ये-जा करताना गैरसोय होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

नागरिकांच्या येण्या-जाण्याच्या मार्गात अडथळे निर्माण केले जात असल्याने प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून रस्ता मोकळा करावा आणि नागरिकांना कायदेशीर हक्काचा मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रशासनाने दहा दिवसांत प्रश्न मार्गी न लावल्यास शिव मारुती मंदिरासमोर शांततामय सामूहिक उपोषण करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. हक्काचा रस्ता मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील, अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.

# पिप्रीं शिवारात हिंस्र कुत्र्यांचा मेंढ्यांच्या कळपावर प्राणघातक हल्ला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** | पिंप्री-लौकी अजमपूर (ता. संगमनेर) शिवारात गुरुवारी (दि. २०) भर दिवसा १० ते १२ हिंस्र कुत्र्यांच्या टोळक्याने रानात चरणाऱ्या मेंढ्यांच्या कळपावर प्राणघातक हल्ला चढवला. या हल्ल्यात चार कोकराचा आणि एका मेंढीचा मृत्यू झाला असून, दोन मेंढ्या आणि एक शेळी गंभीर जखमी झाली आहे. आधीच रानडुकरांच्या उपद्रवाने उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांमध्ये आता या मोकाट कुत्र्यांमुळे दहशत निर्माण झाली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, मेंढपाळ शेतकरी पोपट दातीर यांच्या कुटुंबातील महिला सदस्या या गुरुवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास रानात आपल्या मेंढ्या आणि शेळ्या चारत होते. सर्वत्र शांतता असताना अचानक १० ते १२ हिंस्र आणि मोकाट कुत्र्यांच्या टोळक्याने लांडग्यांसारखा मेंढ्यांच्या कळपावर हल्ला चढवला. या अचानक झालेल्या हल्ल्याने कळपात एकच हाहाकार उडाला. कुत्र्यांनी अक्षरशः लचके तोडत चार कोकर आणि एका मेंढीचा बळी घेतला. तर दोन मोठ्या मेंढ्या आणि एक शेळी या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्या आहेत. इतर मेंढ्यानाही या कुत्र्यांनी चावा घेतल्याची भीती दातीर यांनी व्यक्त केली आहे.

घटनेची माहिती मिळताच आश्वी खुर्द येथील पशुवैद्यकीय अधिकारी अविनाश नागरगोजे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमी मेंढ्या आणि शेळीवर प्राथमिक औषधोपचार केले. मात्र, या मुक्या जनावरांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे. या घटनेमुळे पोपटराव दातीर यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

परिसरात आधीच बिबट्याची मोठी दहशत आहे. त्यातच आता बाहेरून आणून सोडलेल्या या मोकाट कुत्र्यांमुळे भीतीचे सावट अधिकच गडद झाले आहे. हे १० ते १५ कुत्र्यांचे टोळके गावात आणि शिवारात फिरत असते. आज त्यांनी मुक्या जनावरांचा बळी घेतला, उद्या ते शाळेत जाणाऱ्या चिमुकल्या विद्यार्थ्यांवर किंवा शेतात काम करणाऱ्या एकट्या-दुकट्या माणसावर हल्ला करणार नाहीत कशावरून? असा संतप्त सवाल ग्रामस्थ विचारत आहेत.

एकीकडे जनावरांवर हल्ले होत असताना, दुसरीकडे शेतातील उभ्या पिकांची रानडुकरांकडून राजरोसपणे नासधूस सुरू आहे. गेल्या एक महिन्यापासून पानोडी रोड ते दरा भागात तसेच पिंप्री फाटा ते गीते वस्ती या परिसरात रानडुकरांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने उभे केलेले ऊस आणि मक्याचे पीक रानडुकरे एका रात्रीत भुईसपाट करत आहेत. वन विभाग मात्र, इकडे दुर्लक्ष करत असल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.



# पुणतांब्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी भाजी मंडईत जागा निश्चित

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळा व भव्य स्मारकाचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून पुणतांबा येथील भाजी मंडई परिसरात स्मारकासाठी जागा निश्चित करण्यात आली. गुरुवारी सरपंच स्वाती पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेत याबाबत ग्रामस्थांना माहिती देण्यात आली.

स्मारकासोबत व्यापारी संकुल उभारण्यात येणार असून त्याचे भूमिपूजन माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते लवकरच होणार असल्याची माहिती देण्यात आली. गेल्या दोन वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा चांगदेवनगर येथील गोदामात ठेवण्यात आला होता. जागेअभावी स्मारक उभारण्याचा प्रश्न प्रलंबित होता. शिवस्मारक समितीचे अध्यक्ष दत्ता धनवटे यांनी ग्रामसभेत स्मारकाच्या जागेची व प्रस्तावित कामाची माहिती दिली. माजी खासदार डॉ. सुजय विखे यांच्या विशेष प्रयत्नांतून स्मारकासाठी ५० लाख रुपये, तर व्यापारी संकुलासाठी सुमारे पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याचे त्यांनी सांगितले. व्यापारी संकुलात सुमारे १०० गाळे उभारून ते व्यापाऱ्यांना देण्याचे नियोजन आहे.

> ग्रामसभेत ठराविक एक दोन जणच प्रश्न मांडतात. सर्वसामान्य नागरिकाला बोलू दिले जात नाही. अशी खंत नलिनी धनवटे यांनी व्यक्त केली. सर्वसामान्य ग्रामसभेत बोलण्याचा अधिकार आहे. ग्रामसभेत सरपंच व ग्राम विकस अधिकारी यांनी सर्वसामान्यांचे प्रश्न समजावून घेतले पाहिजे.

यावेळी भास्कर मोटकर, अशोक धनवटे व आबासाहेब नळे यांनी स्मारकाची जागा निश्चित करण्याची मागणी केली. माजी सरपंच डॉ. धनंजय धनवटे यांनी शिवस्मारकासाठी ग्रामस्थांनी सुमारे ३७ लाख रुपयांची लोकवर्गणी दिल्याचे सांगून स्मारक उभारणीसाठी सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहन केले. सुहास वहाडणे, धनंजय जाधव व विजय धनवटे यांनीही स्मारकाच्या जागेबाबत माहिती दिली. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या योगदानाबद्दल अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला.

दरम्यान, गावातील अशुद्ध पाण्याचा प्रश्नही ग्रामसभेत गाजला. दीपक धनवटे, मनसेचे गणेश जाधव व सुनील कुलट यांनी ३५ कोटी रुपये खर्च होऊनही नागरिकांना अशुद्ध पाणी प्यावे लागत असल्याचा आरोप केला. जलशुद्धीकरण यंत्रणा कार्यान्वित करण्याची मागणी त्यांनी केली. ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबत गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याचा इशारा देण्यात आला.

गावातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी शिवसेनेचे शहरप्रमुख महेश कुलकर्णी यांनी केली. राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य अनिल नळे, सर्जेराव जाधव, चंद्रकांत वाटेकर यांनी विविध प्रश्न मांडले.

ग्रामसभेस माजी सरपंच सुधाकर जाधव, ग्रामपंचायत सदस्य भूषण वाघ, रामचंद्र पवार, गणेशचे संचालक माजी राजेंद्र थोरात, संभाजी गमे, नितीन सांबारे, गणेश बनकर, संदीप धनवटे, छगन जोगदंड यांच्यासह ग्रामस्थ व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामविकास अधिकारी बाबासाहेब मातंग यांनी विविध विषयांचे वाचन केले.

**ग्रामसभा अर्धवट सोडल्याने युवकांचा संताप**

ग्रामसभेदरम्यान युवकांचे विविध प्रश्न प्रलंबित असताना सरपंच व ग्रामविकास अधिकारी ग्रामसभा सोडून गेल्याने युवकांनी नाराजी व्यक्त केली. सर्वसामान्यांचे प्रश्न मांडण्याची संधी दिली जात नसल्याचा आरोप करत ग्रामसभेच्या कार्यपद्धतीबाबत युवकांनी संताप व्यक्त केला.

## ऑर्डर घेतली का नाही विचारल्याने ग्राहकाला मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : हॉटेलमध्ये दारूची ऑर्डर घेतली नाही, असे विचारल्याच्या रागातून हॉटेल मालक व कामगारांनी ग्राहकाला शिवीगाळ करून लोखंडी रॉड व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना राहुरी येथे घडली. या प्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमोल लक्ष्मण गाडे (वय ३४, रा. बारागाव नांदूर, ता. राहुरी) हे १४ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे १० वाजता मल्हारवाडी रोडवरील म्हसोबा मंदिरासमोरील हॉटेल रायगड येथे गेले होते. त्यांनी वेटरकडे दारूची ऑर्डर दिली. मात्र वेटरने ऑर्डर घेतली नाही. त्यामुळे गाडे यांनी हॉटेल मालक अक्षय वराळे यांना ऑर्डर का घेतली नाही, अशी विचारणा केली.

याचा राग आल्याने हॉटेल मालक अक्षय वराळे व त्याच्यासोबत असलेल्या वेटर आणि कुक अशा तीन अनोळखी व्यक्तींनी गाडे यांना शिवीगाळ करत लोखंडी रॉड तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या प्रकरणी अक्षय वराळे व इतर तीन अनोळखी व्यक्तींविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ९१४/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# द • ख • ल

## कृषी विद्यापीठात ग्राफिक्स डिझायनरपदी नियुक्ती; प्रशांत वांढेकर यांचा सत्कार




**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील देडगाव येथील प्रशांत संदीप वांढेकर यांची पुणे येथील सावित्रीबाई फुले कृषी विद्यापीठात ग्राफिक्स डिझायनरपदी नियुक्ती झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षणभूषण बाजीराव पाटील मुंगसे होते. रघुनाथ कुटे यांनी प्रास्ताविक केले. बालाजी देवस्थानचे विश्वस्त खंडेश्वर कोकरे व सरपंच चंद्रकांत मुंगसे यांनी प्रशांत यांच्या मेहनत, जिद्द व कौशल्याचे कौतुक केले. ग्रामीण भागातील युवकांसाठी त्यांची कामगिरी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. सत्काराला उत्तर देताना प्रशांत वांढेकर यांनी कुटुंबीयांनी ठेवलेल्या विश्वासाला पात्र ठरल्याचा आनंद व्यक्त करत सन्मानाबद्दल सर्वांचे आभार मानले. यावेळी ह.भ.प. बंडू महाराज वांढेकर, विजय चेडे, ज्ञानदेव कदम, सुभाष मुंगसे यांच्यासह ग्रामस्थ, नातेवाईक व मित्रपरिवार उपस्थित होते. सूत्रसंचालन युनूस पठाण यांनी केले.

## अनुजा पवार एमपीएससीतून राज्य कर निरीक्षकपदी



**राहुरी** : राहुरी तालुक्यातील पिंपरी अवघड येथील कु. अनुजा ज्ञानदेव पवार हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षेत यश संपादन करत राज्य कर निरीक्षक (STI) पदाला गवसणी घातली. तिच्या या यशाबद्दल कुटुंबीयांसह परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जिद्द, चिकाटी, सातत्य आणि नियोजनबद्ध अभ्यासाच्या जोरावर अनुजाने हे यश मिळविले. अनेक अडचणींवर मात करत तिने स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू ठेवली. सध्या ती लेखा व कोषागार विभागात कनिष्ठ लेखापाल म्हणून कार्यरत असून, काही दिवसांपूर्वीच महिला व बालकल्याण विभागात पर्यवेक्षकपदीही तिची निवड झाली आहे. अशा प्रकारे अनुजाने शासनाची तीन पदे मिळविण्याची उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अनुजाच्या यशात आई-वडील व बहिणीचा मोठा वाटा आहे. आई-वडिलांनी कष्ट करून तिन्ही मुलांना उच्च शिक्षण दिले. तिची बहीण, दाजी व भाऊही आयटी क्षेत्रात कार्यरत आहेत. मोठे ध्येय ठेवले तर कठोर मेहनतीची तयारीही असावी, हे अनुजाने आपल्या यशातून सिद्ध केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी तिची यशोगाथा निश्चितच प्रेरणादायी ठरली आहे.

## १५ दिवसांत लोणीत दुसऱ्यांदा चोरीचा प्रयत्न; नागरिकांच्या सतर्कतेने डाव उधळला

**प्रवरानगर** : लोणी खुर्द परिसरात अवघ्या पंधरा दिवसांत दुसऱ्यांदा चोरीचा प्रयत्न झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दत्तनगरातील गल्ली क्रमांक १ व २ मध्ये रात्रीच्या सुमारास चोरट्यांनी शेतातून प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. मात्र, कुत्र्यांच्या भुंकण्यामुळे एका नागरिकाला जाग आली. त्याने तत्काळ व्हॉट्सप ग्रुपवर माहिती दिल्याने परिसरातील नागरिक सतर्क झाले. नागरिकांची चाहूल लागताच चोरट्यांनी पळ काढला. काही दिवसांपूर्वी आशीर्वादनगर येथे चोरट्यांनी इंडियन पोल्ट्री फॉर्म, भारत ग्रो आणि साई माऊली किराणा या तीन दुकानांचे कुलूप तोडून चोरी केली होती. या घटनेचा तपास अद्याप पूर्ण झालेला नसतानाच पुन्हा चोरीचा प्रयत्न झाल्याने पोलिसांच्या रात्रीच्या गस्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दरम्यान, लोणी बुद्रुक, लोणी खुर्द व कोल्हार परिसराच्या सुरक्षेसाठी २०० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. मात्र, चोरीच्या घटना सुरूच असल्याने नागरिकांनी रात्रीची गस्त वाढवून मागील चोरींचा तपास तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली आहे.

## नुकसानग्रस्त सर्व विहिरींच्या प्रस्तावांना मंजुरी द्या : आ. आशुतोष काळे

**कोळपेवाडी** : गतवर्षी झालेल्या मुसळधार पाऊस व अतिवृष्टीमुळे कोपरगाव मतदारसंघात निर्माण झालेल्या पुरपरिस्थितीत तब्बल २४२ सिंचन विहिरी खचून व बुजून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. या सर्व नुकसानग्रस्त विहिरींच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावांपैकी केवळ १३२ प्रस्तावांना मंजुरी मिळाली असून उर्वरित ११० प्रस्तावांनाही मंजुरी द्यावी, अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी अहिल्यानगरच्या उपजिल्हाधिकारी वर्षा पवार यांच्याकडे केली आहे. महसूल विभागामार्फत बाधित विहिरींचे प्रत्यक्ष पंचनामे व सर्वेक्षण पूर्ण करून नुकसानभरपाईसाठी २४२ प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आले होते. मात्र त्यापैकी ११० प्रस्ताव नामंजूर करण्यात आल्याने शेतकऱ्यांसमोर सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विहिरींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना पिके घेता आली नाहीत आणि त्यांना आर्थिक फटका बसला. याबाबत आमदार काळे यांनी उपजिल्हाधिकारी वर्षा पवार यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. महसूल विभागाने स्वतः स्थळपाहणी करून प्रस्ताव तयार केले असताना एकाच आपत्तीमध्ये काही प्रस्ताव मंजूर करणे आणि काही प्रस्ताव अमान्य करणे योग्य नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. नुकसानग्रस्त सर्व शेतकऱ्यांना समान न्याय मिळावा आणि सिंचन व्यवस्था पूर्ववत करण्यासाठी अमान्य करण्यात आलेल्या उर्वरित ११० विहिरींच्या प्रस्तावांनाही कोणताही तांत्रिक पेच न निर्माण करता प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी, अशी आग्रही मागणी आमदार काळे यांनी केली आहे.

# भक्ती भगवंताला प्रिय असावी भक्ती दिखावा करणारी नसावी : महंत रामगिरी महाराज

## अखंड हारिनाम सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी ४ लाखाहून भाविकांनी घेतला महाप्रसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव / पुणतांबा** : मनुष्यामध्ये बदल व्हायचा असेल तर त्यांच्या मनाची वृत्तीच बदलली पाहिजे, मनोवृत्ती बदल झाला तरच खर्या अर्थानं समाजामध्ये एक प्रकारची शांतता, समाधान लाभेल. मनाची वृत्ती बदलण्याची ताकद फक्त अध्यात्मामध्ये व अखंड हरिनाम सप्ताहात आहे सप्ताहात भजनाने भंगवताच्या भक्तीची गोडी निर्माण होते तिच भक्ती देवाला आवडते पण त्यामध्ये दिखावा असु नये असे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी धनगरवाडी पंचक्रोशी येथे केले.



श्री क्षेत्र गोदाधाम सराला बेटाचा धनगरवाडी पंचक्रोशी येथे सुरू असलेल्या योगीराज गंगागिरी महाराज १७९ वा अखंड हरिनाम सप्ताहातील तिसऱ्या दिवशी चे दुसरे प्रवचन पुष्प गुंफथांनी ज्ञानेश्वरीच्या श्लोकाचे विवेचन करताना महाराज पुढे म्हणाले की, आज समाजाला अध्यात्माची फार मोठी गरज आहे.गंगागिरी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहातुन अनेकांचे व्यसन नष्ट झाले स्वातंत्र्यपूर्व काळातही महाराजांनी सप्ताह अनेक अडचणी ला सामोरे जात प्रभावीपणे सप्ताह सुरू ठेवले लोकनाट्य तमाशाचे नादी असलेला समाज अध्यात्मिक मार्गावर आणला. आज समाजाची अवस्था पाहिल्यास तर साठ टक्के समाज बिघडलेला अन् व्यसनाधिन झालेला आहे, कुठल्यातरी अमली पदार्थांसारखे व्यसनात तरूणाई गुरफटलेली आहे.

ज्याला आपण वाईट व्यसनं म्हणतो त्याबरोबरच संपत्ती, सत्ता,संतती हे देखिल व्यसनाधीनातील प्रकार आहेत. याच्या पाठीमागेच समाज लागलेला आहे व बिघडलेला आहे. आणि म्हणून या समाजाला खर्या अर्थानं शांती मिळत नाही. चाळीस टक्के समाज थोडा आहे तो कुठं याच्यापेक्षा काहीतरी वेगळं मिळावं म्हणून तो विचार करतो पण तोही दिशाहिन आहे, त्याला योग्य दिशा मिळेनाशी झालीय. नेमकं मी काय करायला पाहिजे? माझं चांगलं वागण्याकरिता माझं जीवन स्वच्छ, जीवन सुखी होण्यासाठी काय करायला पाहिजे? अशा विवेचनेत दिशाहिन समाज झाला आहे. अध्यात्मात आल्यास भजन - किर्तन नाही आले तरी चालेल परंतु वाईट मार्गाने तरी तरुण जाणार नाही .शास्त्र हे नित्य नवीन असुन आयुर्वेदशास्त्र मानवी आरोग्यासाठी फार मोठी देणगी आहे.त्यामुळेच युवकानी व्यसनाच्या आहारी न जाता अध्यात्मिक मार्गावर चालल्यास तरुणाना चांगली दिशा मिळेल अशा दिशाहिन समाजाला योग्य दिशा देऊ कोण देत असेल तर ते फक्त अखंड हरिनाम सप्ताहाच देऊ शकतो.

मनुष्य अज्ञान झाकण्यासाठी पाप करतो दुसऱ्याच्या सुखाचा नाश करतो त्याला कंस म्हणतात दुःख रुपी विश पचवल्या शिवाय सुखाचे लोणी मिळत नाही योगीराज गंगागिरी महाराज यांनी अनेक भक्तांच्या जीवनातील दुःख दूर करून सन्मार्गावर आणले महाराजांनी पारतंत्र्यात अनेक अडचणींना सामोरे जात वेळ प्रसंगी माधुकरी मागवत कण्या घुगऱ्या शिजवत समाजासाठी अन्नदान सुरू ठेवले मनाची वृत्ती बदलण्याची ताकत फक्त हरिनाम सप्ताह आतच असल्याचे महाराज म्हणाले दिवसभर आमटी भाकरीचा महाप्रसाद सुरू होता आज दिवसभरात ४ लाखाहून अधिक भाविकानी आमटी भाकरी चा महाप्रसाद घेतला.

### तुकाराम मुंडे यांचा निर्णय आरोग्याच्या हितासाठी

तुकाराम मुंडे यानी दुधभेसळ पाठोपाठ,खाद्य पदार्थ भेसळ, या बद्दल जो निर्णय घेतला त्या निर्णयामुळे समाजात आजाराचे प्रमाण कमी होईल आरोग्य चांगले असेल तर आपण भजन चांगले करू शकतो त्यामुळे आपण मुंडे साहेब यांचे आभार माणले पाहिजे, शेतकऱ्यांनी शेन्द्रीय शेतीकडे वळावे , औषधी फवारणी कमी प्रमाणात करावी त्यामुळे रोग कमी होईल गोदावरी धाम येथे सुरू केलेल्या आयुर्वेद रूग्णालयाचा रुग्णांना चांगला ऊपयोग होत आहे असे मंहत रामगिरीजी महाराज म्हणाले.

## दशपर्णी अर्कातून नैसर्गिक कीडनियंत्रण तृणधान्य लागवडीचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : राष्ट्रीय अन्नसुरक्षा व पोषण अभियानांतर्गत करुले येथे बळीराजा शेतकरी महिला बचत गटाच्या वतीने पौष्टिक तृणधान्य पिके व दशपर्णी अर्क निर्मितीबाबत मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी मंडळ कृषी अधिकारी विक्रम भवारी यांनी तृणधान्य पिकांची लागवड करताना उत्पादन खर्च कमी करून अधिक उत्पादन मिळविण्यावर शेतकऱ्यांनी भर द्यावा, असे आवाहन केले. दशपर्णी अर्काचा वापर मावा, तुडतुडे यांसारख्या रसशोषक किडी तसेच पाने खाणाऱ्या अळ्यांच्या नियंत्रणासाठी करता येतो. त्यामुळे रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी होऊन उत्पादन खर्चात बचत होण्यास मदत होते.



स्थानिक पातळीवर उपलब्ध नैसर्गिक साधनांचा प्रभावी वापर करून 'कमी खर्चाची शेती, अधिक उत्पादन' या दिशेने वाटचाल करण्याचे आवाहन भवारी यांनी केले. कृषी अधिकारी रामदास भारती यांनी दशपर्णी अर्कासाठी आवश्यक वनस्पती, त्यांचे प्रमाण, अर्क तयार करण्याची पद्धत आणि विविध पिकांमध्ये वापरण्याचे प्रमाण याबाबत प्रात्यक्षिकासह माहिती दिली. सहाय्यक कृषी अधिकारी कोळपे यांनी चिकट सापळे, पक्षी थांबे व प्रकाश सापळ्यांच्या वापराबाबत मार्गदर्शन केले.

कृषी सहाय्यक गडाख यांनी विविध शासकीय योजनांची माहिती दिली. यावेळी गोपीनाथ आहेर यांच्या बाजरी प्लॉटला भेट देण्यात आली. राजेंद्र आहेर यांनी शेतीचे अनुभव सांगितले. अध्यक्षा झुंबर आहेर, सचिव सुमन आहेर यांच्यासह महिला शेतकरी उपस्थित होत्या.

## माजी विद्यार्थ्यांनी जपली शाळेप्रती सामाजिक बांधिलकी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**आश्वी खुर्द** : संगमनेर तालुक्यातील आश्वी खुर्द जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पहिली ते चौथीच्या सर्व १०६ विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थी व ग्रामपंचायत सदस्यांच्या वतीने मोफत स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. माजी विद्यार्थी व पुणे येथील युवा उद्योजक अशोक गबाजी भोसले आणि त्यांचे बंधू, ग्रामपंचायत सदस्य संजय गबाजी भोसले यांनी स्वखर्चातून विद्यार्थ्यांना दर्जेदार स्कूल बॅग भेट देत शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या कला व क्रीडा गुणांना वाव मिळावा यासाठी वैद्यकीय व्यावसायिक मयुरेश नामदेव शिंदे यांनी शाळेला लेझीम संच भेट दिला. या उपक्रमातून प्रेरणा घेत गावातील दानशूर व्यक्ती व माजी विद्यार्थ्यांनीही शाळेच्या विकासासाठी आर्थिक मदत केली.

स्वप्न सागर हॉटेलचे संचालक श्रीकांत अनिल तक्ते यांनी वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शैक्षणिक व क्रीडा साहित्य खरेदीसाठी ५ हजार १०० रुपये, वैभव गंगाधर गायकवाड यांनी २ हजार १०० रुपये, तर माजी विद्यार्थिनी सुनिता सुभाष थोरात यांनीही २ हजार १०० रुपयांची देणगी दिली.

या दातृत्वामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढला असून, ग्रामीण शाळांच्या विकासासाठी माजी विद्यार्थी व समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढाकार घ्यावा, असा संदेश या उपक्रमातून मिळाला. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी सर्व दात्यांचे आभार मानले.

## कॅमेऱ्यापेक्षा 'व्हिजन' बदला

### श्रीरामपुरात फोटोग्राफर्सना भोर यांचे मार्गदर्शन




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : केवळ महागडा कॅमेरा घेतल्याने फोटोग्राफी व्यवसायात यश मिळत नाही, तर फोटोग्राफरची कलात्मक दृष्टी व व्हिजन बदलणे आवश्यक आहे, असा संदेश पुणे येथील प्रसिद्ध फोटोग्राफर व मेंटॉर सचिन भोर यांनी दिला. जागतिक छायाचित्रण दिनानिमित्त श्रीरामपूर तालुका फोटोग्राफर्स असोसिएशनच्या वतीने खा. गोविंदरावजी सभागृहात आयोजित एकदिवसीय वेडिंग फोटोग्राफी कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यशाळेला सुमारे १५० फोटोग्राफर्सनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी वेडिंग फोटोग्राफी, कपल शूट, योग्य लायटिंग, वेन्यूचा प्रभावी वापर आणि छायाचित्रांमध्ये कलात्मकता आणण्याच्या तंत्रांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. लाईव्ह डेमोद्वारे आधुनिक फोटोग्राफीचे बारकावे प्रत्यक्ष दाखविण्यात आले. बदलत्या ग्राहकांच्या अपेक्षा लक्षात घेऊन ग्रामीण भागातील फोटोग्राफर्सनीही स्वतःला सातत्याने अपडेट करावे, असे भोर यांनी सांगितले. कार्यशाळेत फोटोग्राफर्सच्या सुरक्षिततेचा मुद्दाही मांडण्यात आला. प्रसिद्धीप्रमुख प्रवीण जमधडे यांनी विवाह व हळदीच्या कार्यक्रमांनंतर रात्री उशिरा प्रवास करताना निर्माण होणाऱ्या धोक्यांकडे लक्ष वेधले. फोटोग्राफर्ससाठी अल्पदरात हेल्थ इन्शुरन्स व अपघाती विमा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. अध्यक्ष संदीप ठोकळ, उपाध्यक्ष विपुल तोरणे, सचिव संतोष देसाई, खजिनदार अतिश देसर्डा, कार्याध्यक्ष सुशील रांका, रोहित साबळे, भानुदास बेरड, गौरव शेटे, सौरभ कापसे, दीपक सातपुते यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहाचे निमंत्रण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : धनगरवाडी व पंचक्रोशीच्या वतीने आयोजित सद्गुरू श्री गंगागिरीजी महाराजांच्या १७९व्या अखंड हरिनाम सप्ताहाचे निमंत्रण महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले. आयोजकांच्या शिष्टमंडळाने मुंबई येथे शिंदे यांची भेट घेऊन अधिकृत निमंत्रणपत्रिका, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान केला.



यावेळी खासदार भाऊसाहेब वाकचौरे, सरला बेटाचे विश्वस्त मधुकर महाराज, शिवसेना जिल्हाप्रमुख कमलाकर कोते, सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ डोळे व नितीनराव औताडे उपस्थित होते. १७९ वर्षांपासून अखंड सुरू असलेला हा हरिनाम सप्ताह भक्ती, सेवा व एकात्मतेचे प्रतीक मानला जातो.

कीर्तन, प्रवचन, भजन व सामूहिक हरिनामामुळे सप्ताह काळात संपूर्ण परिसर भक्तिमय होतो. आयोजकांनी सप्ताहाच्या नियोजनाबाबत शिंदे यांच्याशी चर्चा करून रस्ते, पाणी, आरोग्य व सुरक्षेसाठी शासकीय सहकार्याची मागणी केली. शिंदे यांनी निमंत्रण स्वीकारून संत परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले.


### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/२३९/२०२६
नेवासा दिनांक. ०७/०८/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-नय्युम हसन इनामदार, रा.खेडले परमानंद, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम/कु.नय्युम हसन इनामदार, रा.खेडले परमानंद, ता.नेवासा, यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव- नय्युम हसन इनामदार, गावाचे नाव-शिरेगाव, जन्म दिनांक-०१/०६/१९८१

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी ज़न्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/१७१/२०२६
नेवासा दिनांक. १३/०८/२०२६

अर्जदार श्री/श्रीम- लाला बाळु फुलमाळी, रा.अंतरवली, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम/कु.सावित्री लाला फुलमाळी, रा.अंतरवली, ता.नेवासा, यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव- सावित्री लाला फुलमाळी, गावाचे नाव-अंतरवली, जन्म दिनांक-०६/०३/२०१८

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी ज़न्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहिर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः नेवासा खुर्द, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर व परिसरातील सर्व लोकांना आमचे अशिल यांनी दिलेल्या माहितीवरुन, दाखविलेल्या कागदपत्रावरुन जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यांत येते की,

आमचे अशिल नामे जितेंद्र दत्तात्रय गायकवाड, यांनी नेवासा खुर्द ता. नेवासा जि. अहिल्यानगर येथील शेतजमिन गट नंबर ६६७ पैकी शहेनाजबी हाफिजखान पठाण व मोहसीनखान हाफिजखान पठाण आणि मतीनखान मोहसीनखान पठाण यांचे सामाईक हिश्याचे खाते क्र. ९४८७ क्षेत्र २ हे ६७.०० आर आकार ७ रुपये ८६ पैसे यापैकी यांनी निता अवधुत पुंड यांच्या क्षेत्रास लागून पश्चिम बाजूचे ० हे ८०.०० आरचा विसार पावतीचा मे. नोटरी पब्लिक साहेब यांच्या समोर दस्त क्र. ३३३/२०२६ दि.०७/०८/२०२६ नोंदवलेला असून सदर क्षेत्राची चर्तुसिमा पूर्वेस- निता अवधुत पुंड यांचे क्षेत्र दक्षिणेस- जुम्माखान पठाण व अफरोज शहानवाजखान पठाण यांची मिळकत पश्चिमेस गटापैकी इरफानखान ईलायतखान व आसिफखान ईलायतखान पठाण यांच्या हिश्याची वाटणी उत्तरेस नेवासा खूपटी रोड येणे प्रमाणे असुन त्यांनी सदर मिळकतीचे मालक अनुक्रमे शहेनाजबी हाफिजखान पठाण व मोहसीनखान हाफिजखान पठाण आणि मतीनखान मोहसीनखान पठाण यांचा सौदा आमचे अशिलाशी जास्तीत जास्त बाजार भावाने सौदा ठरलेला असुन हे कायम खरेदीखत करुन देण्याचे आमचे अशिलाशी जितेंद्र दत्तात्रय गायकवाड यांच्या मध्ये ठरलेला आहे. हे उभयतांना मान्य व कबुल आहे.

सबब झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत आमचे कार्यालयात हजर राहुन तसे कागदपत्रे, पुरावे देऊन आमची खात्री पटवुन द्यावी, अन्यथा वरील या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तिचा, संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, मालकी, गहाण दान, बक्षिस, खरेदी, पोटगी, दावा अगर तत्सम स्वरुपाचे दस्त ऐवज तसेच मिळकती संबधी काही अर्थिक देणे घेणे, बँका, पतसंस्था, वित्तीय संस्थेचे असलेले कर्ज तसेच हरकती, न्यायालयीन वाद, स्थगिती, हुकुमनामा, प्रलंबित दावे वगैरे प्रकारचा सबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द मुदतीत कुणीही हरकत न घेतल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, निष्कर्ज आहे असे समजुन खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील, मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही व हक्क असल्यास ते हक्क सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल. याची नोंद घ्यावी.

नेवासा,
दि. २०/०८/२०२६

**(श्री. डि. के. चक्रनारायण)**
**ॲडव्होकेट नेवासा कोर्ट नेवासा न्यायालयासमोर,**
**नेवासा खुर्द,ता. नेवासा, जि. अहिल्यानगर**
**मो. ९८९०७३९९४३**


# मुळा धरणातून शेतीसाठी आज आवर्तन सुटणार : आ. विठ्ठलराव लंघे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : मुळा धरणातून शेतीसाठी आज आवर्तन सुटणार असल्याची माहिती आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी दिली.राज्याचे जलसंपदा मंत्र व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या भक्कम साथीमूळे भर उन्हाळ्यासह पावसाळ्यातही शेतकऱ्यांना वेळेवर आवर्तन मिळत असल्याचे खरे समाधान असल्याचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी सांगितले.



यंदाच्या पावसाळा ऋतूच्या खरीप हंगामातही शेतकऱ्यांना पिकांसाठी पाण्याच्या आवर्तनाची नितांत गरज भासू लागल्यामुळे आमदार विठ्ठलराव लंघे -पाटील यांनी शेतकऱ्यांची ही मागणी लक्षात घेवून मुळा धरणातून शेत पिकांसाठी पाण्याचे आवर्तन सोडण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आमदार लंघे - पाटील यांनी मुळा धरणातून आवर्तन सोडण्यासाठी साकडे घातले त्यामुळे पालकमंत्री विखे पाटील यांनी तातडीने मुळा धरणातून पाणी सोडण्याचे आदेश मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील यांना दिल्यामुळे आज शुक्रवार दि.२१ ऑगस्ट रोजी मुळा धरणातून पाण्याचे आवर्तन सोडले जाणार असल्यामुळे शेतकऱ्यांतून पालकमंत्री विखे पाटील आणि आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या कामगिरीचे मोठे कौतुक केले जात असून पालकमंत्री विखे यांना शेतकऱ्यांतून धन्यवाद दिले जात आहे.

यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना पिकांसाठी पाण्याच्या आवर्तनाची मोठी गरज होती अनेक शेतकऱ्यांनी मला आवर्तन सोडण्यासाठी मागणीही केलेली होती आपण याबाबत पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी लगेच मुळा धरणातून तातडीने आवर्तन सोडण्याचे आदेश मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील यांना दिले. आज शुक्रवारी सायंकाळी आवर्तन सोडले जाणार असल्याची माहिती आ. विठ्ठलराव लंघे यांनी दिली.

> पालकमंत्री राधाकृष्ण विखे आणि आ. विठ्ठलराव लंघे यांनी नेवासा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांसाठी भर उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात सुद्धा कधीही पाणी कमी पडू दिले नसल्याने बळीराजा मंत्री विखे आणि आ. विठ्ठलराव लंघे यांचा शतशः ऋणी राहणार आहे.
>
> **सतीश काळे,**
> **सरपंच, तेलकुडगाव**


## नगरपंचायत कार्यालय, कर्जत

ता. कर्जत, जि.अहिल्यानगर

फोन नं -०२४८९-२२२०१२ Email-cokarjat55@gmail.com

कार्यालय/नपा/जा.क्र/१७२२/२०२६ दि. २०/०८/२०२६

### जाहीर सुचना

#### कर्जत नगरपंचायत हद्दीतील एकल महिला सर्वेक्षण

कर्जत नगरपरिषद हद्दीतील एकल महिलांची सामाजिक, आर्थिक व शासकीय योजनांशी संबंधित माहिती संकलित करण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणामध्ये पतीचे निधन झालेल्या, घटस्फोटित, पतीने परित्याग केलेल्या, अविवाहित तसेच इतर कारणांमुळे एकट्या राहून स्वतःचा उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांची नगरपंचायत कार्यालयामार्फत नाव नोंदणी आयोजित करण्यात आलेले आहे. तरी कर्जत नगरपंचायत हद्दीतील पात्र महिला लाभार्थ्यांनी सदर कालावधीमध्ये कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडुन, ०१) एकल महिलेचे संपूर्ण नाव, ०२) एकल प्रकार (विधवा /परित्यक्ता / घटस्फोटित / अविवाहित), ०३) (१८ वर्षावरील) वय ०४) संपूर्ण पत्ता (वार्ड नं. घर क्र., इत्यादी), ०५) आधार क्रमांक, ०६) शिक्षण, ०७) उदरनिर्वाहाचे साधन, ०८) मासिक उत्पन्न, ०९) एकल महिला दिव्यांग आहे का ? (होय / नाही), १०) कुटुंबातील सदस्यांची संख्या (१८ वर्षा खालील), ११) कुटुंब दारिद्रयरेषेखाली आहे का? (होय । नाही), १२) बचत गटाची सदस्य आहे का? (होय / नाही), १३) शासकीय योजनांचा लाभ घेतला आहे का? असल्यास, योजनांची नावे, इ. माहिती भरून अर्ज नगरपंचायत कर्जत, राशीन रोड येथे सादर करावेत.

**सर्वेक्षण कालावधीः दि. २०/०८/२०२६ ते २७/०८/२०२६**
**सर्वेक्षण पद्धत : न.प. कर्जत येथे नाव नोंदणी करून.**

सर्व संबंधित एकल महिलांनी सर्वेक्षणासाठी आवश्यक माहिती व सहकार्य करावे. सर्वेक्षणाद्वारे प्राप्त माहिती गोपनीय ठेवण्यात येईल व शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी त्याचा उपयोग करण्यात येईल. अधिक माहितीसाठी कर्जत नगरपंचायत कार्यालयाशी संपर्क साधावा. **"सहकार्य करा... सर्वेक्षण यशस्वी करा।"**

शिक्का

सही/-
**मुख्याधिकारी**
**कर्जत नगरपंचायत कर्जत जि.अहिल्यानगर.**

## द•ख•ल



### नवजीवन विद्यालयात राजीव गांधी जयंतीनिमित्त सद्भावना दिन साजरा

**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने येथील नवजीवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीचे औचित्य साधून विद्यालयात सद्भावना दिनही साजरा करण्यात आला. यावेळी श्री. लोढे सर यांनी स्व. राजीव गांधी यांच्या जीवनकार्याचा विद्यार्थ्यांना थोडक्यात परिचय करून दिला. राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता व शांतता यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देत त्यांच्या माध्यमातून सद्भावना दिनाची प्रतिज्ञा घेण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे उपप्राचार्य जयराम नांगरे सर, प्राचार्य डॉ. रमेश खैरे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### माथणी शाळेस लोकसहभागातून हायटेक विज्ञान गणित प्रयोगशाळा



**नगर तालुका :** तालुक्यातील माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत लोकसहभागातून अप्रवा एनर्जी प्रा.लि. या कंपनीकडून विज्ञान - गणित हायटेक प्रयोगशाळा सी .एस. आर. फंडातून लोकसहभाग म्हणून नुकतीच देण्यात आली असल्याची माहिती शाळेतील शिक्षक सुनिल अडसूळ आणि राहुल व्यवहारे यांनी दिली. हायटेक प्रयोगशाळेचे उद्घाटन सरपंच, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, पालक व ग्रामस्थ यांच्या हस्ते करण्यात आले . शाळेतील शिक्षक सुनिल अडसूळ व राहुल व्यवहारे यांनी ही प्रयोगशाळा मिळणे कामी विशेष प्रयत्न केले .या प्रयोगशाळेत विज्ञान - गणिताचे विविध प्रयोग आहेत. प्रयोगासाठी लागणारे सर्व साहित्य हे अत्याधुनिक आहे. प्रयोगामध्ये विज्ञान -गणित या विषयाचे डोळ्याचा नमुना, जलविद्युत ,फुफ्फुसाचा नमुना, पचनसंस्था ,फुलांचे अवयव, अन्नाचे पिरॅमिड ,ग्रहणे, पवनचक्की, जीवनचक्र, पेशीरचना, चेतासंस्था, पदार्थांच्या अवस्था ,अपूर्णांकाची संकल्पना, संख्यारेषा माहिती, कोनाचे प्रकार, त्रिकोण ओळख, चौकोनाचे गुणधर्म ,मूलभूत गणिती क्रिया, भौमितिक संकल्पना असे अनेक प्रयोग आहेत. प्रयोग विद्यार्थ्यांना कृतिशीलपणे दाखवले जातात.

### तारकपूर बसस्थानकाजवळ पान दुकानावर छापा; एकाला पकडले

**अहिल्यानगर :** तारकपूर बसस्थानकासमोरील एका पान दुकानावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून शासनाने बंदी घातलेला गुटखा व सुगंधी तंबाखूचा साठा जप्त केला आहे. या कारवाईत एका विक्रेत्याला मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले असून माल पुरवणाऱ्या शेवगावच्या पुरवठादारांसह चौघांविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार योगेश अशोक भिंगारदिवे यांनी या प्रकरणी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस पथक तोफखाना हद्दीत गस्त घालत असताना तारकपूर येथील ग्लोबल पान दुकानात बेकायदेशीर गुटख्याची विक्री सुरू असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन पंचांसमक्ष दुकानाची झडती घेतली. या झडतीदरम्यान सद्दाम इसाक शेख (वय ३१, रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) हा बंदी असलेल्या विमल, रजनीगंधा पानमसाला तसेच बाबा व तुलसी सुगंधी तंबाखूची विक्री करताना रंगेहात पकडला गेला. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून २ हजार ९४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ताब्यातील आरोपी सद्दाम शेख याच्याकडे विचारपूस केली असता, हा माल त्याला मुकुंदनगर येथील हसनेन शेख याच्या मध्यस्थीने शेवगाव येथील आत्तु उर्फ आदीबखान आय्युबखान पठाण आणि पाश्या उर्फ फिरदोस खान पठाण यांनी विक्रीसाठी पुरवल्याचे समोर आले. या प्रकरणी पोलिसांनी मुख्य विक्रेता सद्दाम इसाक शेख, मध्यस्थी हसनेन शेख, तसेच पुरवठादार आदीबखान पठाण व फिरदोस खान पठाण या चौघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दळवी करत आहेत.

# गायत्रीला न्याय मिळालाच पाहिजे!

## अहमदनगर होमिओपॅथी मेडिकल कॉलेजच्या आवारातच ठिय्या

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरांमधील सावेडी नाका येथील अहमदनगर होमिओपॅथी मेडिकल कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या गायत्री अवताडे हिचा १७ ऑगस्ट रोजी मृत्यू झाल्यानंतर या घटनेचे पडसाद आता थेट कॉलेज प्रशासनाच्या दारात उमटले आहेत. गायत्रीच्या मृत्यूची सखोल चौकशी करून या घटनेला जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, या मागणीसाठी मेडिकल कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी आज (२० ऑगस्ट) कॉलेजच्या प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन सुरू केले. गायत्रीच्या मृत्यूबाबत विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संताप असून, आपत्कालीन परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी कॉलेजमध्ये तत्काळ रुग्णवाहिका उपलब्ध असावी, तसेच आवश्यक वैद्यकीय मदत देण्यासाठी प्रशिक्षित टीम कायमस्वरूपी उपलब्ध ठेवावी, अशीही मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.



विद्यार्थ्यांचा सवाल केवळ सुविधांपुरता मर्यादित नसून, गायत्रीच्या मृत्यूमागे नेमकी परिस्थिती काय होती आणि या प्रकरणात कोणाची निष्काळजीपणा किंवा हलगर्जीपणा झाला का? याची सखोल चौकशी करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

दोषी आढळणाऱ्या कॉलेज प्रशासनातील संबंधित शिक्षक अथवा कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे. दरम्यान, आंदोलनाची माहिती मिळताच तोफखाना पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी चर्चा सुरू केली आहे.

विद्यार्थ्यांची समजूत काढण्याचे प्रयत्न पोलिसांकडून सुरू आहेत. मात्र, या आंदोलनानंतर आता सर्वात मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. गायत्रीच्या मृत्यूला नेमके जबाबदार कोण? या प्रश्नाचे उत्तर तपासातून समोर येणार का, कॉलेज प्रशासनाची भूमिका काय असणार आणि प्रशासन दोषींवर कारवाई करणार का, याकडे आता अहिल्यानगरचे लक्ष लागले आहे.

## खेळाडूंच्या पाठीवर उद्योजक विश्वास गुंजाळ यांची कौतुकाची थाप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा :** ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देत त्यांच्या पाठीवर कौतुकाची अनोखी थाप देण्याचा उपक्रम देवदैठणच्या सरपंच जयश्रीताई गुंजाळ व उद्योजक विश्वासभाऊ गुंजाळ यांच्या अवधूत ऑटो कंपोनंट, चिखली यांच्या वतीने राबविण्यात आला. श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेतील खेळाडूंना स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून तब्बल ५० स्पोर्ट्स टी-शर्ट भेट देण्यात आले.

प्रशालेतील विद्यार्थी दरवर्षी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये जिल्हा, विभाग तसेच राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थितीतही खेळाडूंनी मिळविलेल्या या यशाची दखल घेत गुंजाळ कुटुंबीयांनी खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम राबविला.सुमारे २० हजार रुपये किमतीचे उत्तम दर्जाचे ५० स्पोर्ट्स टी-शर्ट खेळाडूंना भेट देण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी अतुल लोखंडे, जयश्रीताई गुंजाळ, रेश्मा कौठाळे, लक्ष्मीकांत दंडवते, पी. जे. मेरगळ, सुवर्णा ढवळे, सतीश वाघमारे, रामचंद्र वाघमारे, सर्जेराव कौठाळे, जयसिंग कौठाळे, नानाभाऊ वाघमारे आदी उपस्थित होते. खेळाडूंसाठी करण्यात आलेल्या या मदतीबद्दल प्रशालेच्या वतीने मुख्याध्यापक पी. जे. मेरगळ व क्रीडाशिक्षक संदीप घावटे यांनी सरपंच जयश्रीताई गुंजाळ व उद्योजक विश्वासभाऊ गुंजाळ यांचे आभार मानले.

> ग्रामीण भागातील आमच्या शाळेतील खेळाडू प्रतिकूल परिस्थितीतही क्रीडाशिक्षक संदीप घावटे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट कामगिरी करत राज्य व राष्ट्रीय पातळीवर पोहोचत आहेत. या खेळाडूंना सातत्याने क्रीडा साहित्याच्या माध्यमातून मदत करण्याचा आमचा प्रयत्न असतो. यावेळीही खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांनी भविष्यात आणखी चांगली कामगिरी करावी, या हेतूने स्पोर्ट्स टी-शर्ट भेट दिले.
>
> **विश्वासभाऊ गुंजाळ, उद्योजक, अवधूत ऑटो कंपोनंट**

## ताजनापूर उपसा सिंचन योजनेचे पाणी शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**शेवगाव :** शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील शेतकऱ्यांना ताजनापूर उपसा सिंचन योजनेच्या टप्पा क्रमांक २चे पाणी तातडीने उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी शेवगाव येथील जायकवाडी वसाहतीतील ताजनापूर सिंचन कार्यालयात धडक देत कार्यकारी अभियंता आनंद उपाध्ये यांची भेट घेतली. यावेळी पदाधिकाऱ्यांनी विविध मागण्यांचे निवेदन सादर करून योजनेच्या कामाची सद्यस्थिती, पाणी वितरण आणि लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना प्रत्यक्ष सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सविस्तर चर्चा केली.

शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागात यंदा अपेक्षित पाऊस झालेला नसल्याने खरीप पिकांवर संकट ओढवले आहे. शेतकऱ्यांनी मोठा खर्च करून कापूस, बाजरी, उडीद, मूग यासह विविध पिकांची पेरणी केली आहे. मात्र पावसात खंड पडल्याने अनेक ठिकाणी पिकांच्या वाढीवर परिणाम झाला आहे. पिके वाचविण्यासाठी तातडीने संरक्षित सिंचनाची गरज निर्माण झाली आहे. ताजनापूर उपसा सिंचन योजनेचा टप्पा क्रमांक २ हा पूर्व भागातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या योजनेमुळे मोठ्या क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणे अपेक्षित आहे. त्यामुळे योजनेची उर्वरित कामे तातडीने पूर्ण करून शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत प्रत्यक्ष पाणी पोहोचवावे, अशी मागणी संघटनेने केली. तसेच नदी, नाले, तलाव आणि बंधारे पाण्याने भरून देण्याची मागणीही संघटनेने केली. या जलस्रोतांमध्ये पाणी उपलब्ध झाल्यास पिकांना संरक्षित सिंचन मिळण्याबरोबरच भूजलपातळी वाढण्यास आणि भविष्यातील पाणीटंचाई दूर करण्यास मदत होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. योजनेची उर्वरित कामे युद्धपातळीवर पूर्ण करावीत, गावनिहाय व दिनांकानुसार पाणी वितरणाचे वेळापत्रक जाहीर करावे, पंपगृह, विद्युत व्यवस्था, मुख्य पाइपलाइन तसेच वितरण प्रणालीतील अडथळे दूर करावेत आणि योजनेस मंजूर निधी, झालेला खर्च व प्रलंबित कामांची माहिती सार्वजनिक करावी, अशा मागण्याही संघटनेने केल्या.

## विठ्ठल रुक्मिणी सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी येथे विठ्ठल रुक्मिणी अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याचे कीर्तनाने झाली. यावेळी ह भ प भगवान महाराज मचे यांनी आपल्या सुमधुर वाणीतूनविश्व संत जगद्गुरु श्री तुकोबारायांचा बाळ क्रीडा प्रकरणातील तीन काड्याचा अभंग सोडविला त्यातून त्यांनी,सांप्रदायाचा हे दंडक आहे साप्ता किती दिवसाचा असू द्या तो तीन दिवसाचा असू द्या सात दिवसाचा असू द्या पंधरा दिवसाचा असू द्या एक महिन्याचा असू द्या त्याची सांगता समाप्ती ही काल्याच्या कीर्तनानेच होत असते त्याचं कारण असं आहे की भगवानपरमात्मा चे अनंत अवतार आहेत भगवंताने अनंत अवतार घेतलेहे त्यांनी उदाहरणाने पटवून दिले. या सप्ताहासाठी चिचोंडी येथील युवा सरपंच श्रीकांत आटकर माजी पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य संदीप दानवे,पद्माकर आव्हाड ह भ प पांडुरंग महाराज आव्हाडतसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी संतांचे आत्म स्वरूप सगुण निर्गुण उपासना महापुरुषाची साधना अनंत भक्ती आणि कीर्तन परंपरेचे महत्व यावर मार्गदर्शन केले महंत भगवान महाराज मचेम्हणाले संतांचा मृत्यू होत नसतो मारणारे शरीर असते आत्मा कधी मरत नाही. किर्तन हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून जीवाला भाव बंधनातून मुक्त करण्याची परंपरा आहे कीर्तनात भक्ती आणि ज्ञानाला महत्त्व असले पाहिजे कीर्तनाच्या पवित्र परंपरेला बाधा आणणाऱ्याप्रवृत्ती बाबत त्यांनी खंत व्यक्त केली. या सप्ताह प्रसंगी हाहा सप्ताह २०० वर्षांपूर्वीचा असल्याने त्याच्यात कोणतीही विकृतही आणू नये हा सप्ताह असाच अखंड सुरू राहावा असे आव्हान महाराजांनी केले.

## संत भगवानबाबा मल्टिस्टेट प्रकरणी लुनिया यांच्यासह संबंधितांवर एम.पी.आय.डी. अंतर्गत कारवाईची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** श्री संत भगवानबाबा मल्टिस्टेट प्रकरणातील संतोष प्रकाश लुनिया, संबंधित संचालक तसेच तपासात दोषी आढळणाऱ्या सर्व संबंधित व्यक्तींवर एम.पी. आय.डी. कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी जन आधार सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा ठेवीदारांचे प्रतिनिधी प्रकाश पोटे आणि गणेश शेकडे यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांना देण्यात आले. यावेळी प्रतीक बडे, रामराव नगरे, रामदास बडे, बंडू वरदे रवींद्र नजन आदीसह सर्व संबंधित ठेवीदार उपस्थित होते.

या प्रकरणात अनेक ठेवीदारांनी प्रकाश पोटे यांच्याकडे लेखी तक्रारी व निवेदने दिली असून, त्यांच्या अर्जांच्या आधारे हे निवेदन साद करण्यात आले आहे. यापूर्वी १७ जुलै २०२६ रोजी पोलीस प्रशासनाकडे सविस्तर निवेदन देऊन कथित सहा कोटी रुपयांच्या आर्थिक व्यवहारांसह जमीन व्यवहार व इतर आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. संतोष प्रकाश लुनिया यांनी भगवानबाबा मल्टिस्टेटमधील फरार आरोपी संचालकांना लपवून ठेवले किंवा संरक्षण देऊन मदत केली असल्याचा गंभीर आरोप ठेवीदारांनी केला आहे. तसेच आरोपींना विविध आर्थिक व्यवहारांमध्ये मदत झाली का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे लुनिया यांची भूमिका तपासाच्या दृष्टीने महत्त्वाची असून, कायदेशीर प्रक्रियेनुसार त्यांची चौकशी करून सहभाग निष्पन्न झाल्यास सहआरोपी करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.

अनेक ठेवीदारांनी लुनिया यांच्या सांगण्यावरून भगवानबाबा मल्टिस्टेटमध्ये ठेवी ठेवल्याचे लेखी अर्ज दिल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे त्यांनी ठेवीदारांना संस्थेत पैसे ठेवण्यास प्रवृत्त करणाऱ्या एजंटसदृश व्यक्तीची भूमिका बजावली होती का, याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच लुनिया यांनी भगवानबाबा मल्टिस्टेटच्या संबंधित संचालकांकडून खरेदी केलेल्या जमीन व्यवहारांचीही सखोल तपासणी करावी. हे व्यवहार सामान्य खरेदी-विक्रीचे होते की फरार संचालकांना वाचविण्यासाठी अथवा त्यांची मालमत्ता सुरक्षित ठेवण्यासाठी करण्यात आले होते, याची आर्थिक व कायदेशीर पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली.

लुनिया यांच्या मोबाईलचे सी.डी.आर. आवश्यक तांत्रिक तपशील, लोकेशन तसेच आर्थिक व्यवहारांची कायदेशीर प्रक्रियेनुसार तपासणी करून फरार संचालकांशी असलेला संपर्क आणि संभाव्य आर्थिक व्यवहारांची पडताळणी करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. याशिवाय रावसाहेब पटवर्धन पतसंस्था तसेच भाग्यलक्ष्मी मल्टिस्टेट/ पतसंस्थेशी संबंधित लुनिया यांच्या आर्थिक व्यवहार व भूमिकेची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.

### श्रीगोंदा औद्योगिक क्षेत्रातील भुखंडावरून मुरुम व मातीची चोरी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बेलवंडी :** श्रीगोंदा औद्योगिक क्षेत्रासाठी अधिग्रहित करण्यात आलेल्या लोणी व्यंकनाथ येथील मौजे, पार्वतवाडी, पिसोरे मधील जमिनीवरून अज्ञातांकडून अनधिकृतपणे मुरुम व मातीची चोरी केली जात असल्याचे समोर आले आहे. एमआयडीसी प्रशासनाकडून माती चोरी झालेल्या जागेची प्रत्यक्ष पाहणी झाली असून या प्रकारामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, याप्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल करावा, असे अधिकृत पत्र एमआयडीसीच्या स्थापत्य उपविभागाने श्रीगोंदा व बेलवंडी पोलिसांना दिले आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत श्रीगोंदा तालुक्यातील मौजे पर्वतवाडी येथील १७८.७४ हेक्टर आणि मौजे पिसोरे येथील ७३.६९ हेक्टर अशी एकूण २५२.४३ हेक्टर जमीन दि. १६ एप्रिल २०२६ रोजी ताब्यात घेण्यात आली आहे. या जमिनीची नोंद ७/१२ उताऱ्यावर महामंडळाच्या नावाने झाली आहे.मात्र, एमआयडीसीच्या ताब्यात असलेल्या या भूखंडावर काही अज्ञात व्यक्ती अनधिकृतपणे गौण खनिज (मुरुम व माती) चे उत्खनन करत असून वाहनांद्वारे ती दुसरीकडे वाहतूक करून नेत आहेत. यापूर्वी देखील दि. ३० एप्रिल २०२६ रोजी एमआयडीसी कार्यालयाकडून गुन्हा नोंदवण्यासाठी पोलिसांना पत्र देण्यात आले होते.

> **एमआयडीसीकडून गुन्हा दाखल करण्याची मागणी**

# आधुनिक शहरांच्या परिवर्तनासाठी काँग्रेसचा 'अर्बन ट्रान्सफॉर्मेशन ग्रुप'

## स्व. राजीव गांधीच्या जयंतीनिमीत्त अभिवादन : आठवणींना उजळा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** भारताचे माजी पंतप्रधान, आधुनिक भारताचे शिल्पकार स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने कालिका प्राईड, लाल टाकी येथे अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कार्यक्रमात ब्लॉक अध्यक्ष फिरोज शफी खान, राजेंद्र कर्डिले, रवी सातपुते, सुभाष रणदिवे, श्यामराव वागस्कर, अभिनय गायकवाड, गणेश भोसले, सय्यद गालीब, अभिजीत कांबळे, काँग्रेस पक्षाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शहरातील मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी दीप चव्हाण यांनी राजीव गांधी यांच्या आठवणींना उजाळा देताना त्यांच्या आधुनिक भारताच्या संकल्पनेचा आणि दूरदृष्टीच्या नेतृत्वाचा विशेष उल्लेख केला. राजीव गांधी यांनी भारताला आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात नेण्याची दिशा दिली. विज्ञान-तंत्रज्ञान, संगणक, दूरसंचार आणि आधुनिक प्रशासनाच्या माध्यमातून भारताला भविष्यासाठी तयार करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. तरुण शक्तीवर विश्वास ठेवून देशाच्या विकासात युवकांचा सहभाग वाढविण्याचा त्यांचा दृष्टिकोनही अत्यंत महत्त्वाचा होता.

राजीव गांधी यांनी देशाच्या एकात्मतेसाठी आणि लोकशाही मूल्यांच्या संरक्षणासाठी कार्य केले. देशसेवेच्या कार्यात असताना त्यांना आपल्या प्राणांचे बलिदान द्यावे लागले. त्यांचे बलिदान हे देशाच्या इतिहासातील अत्यंत वेदनादायी पर्व आहे. त्यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त केवळ त्यांच्या स्मृतींना अभिवादन न करता त्यांनी दाखविलेल्या आधुनिक, वैज्ञानिक, तंत्रज्ञानस्नेही आणि लोकाभिमुख भारताच्या वाटेवर चालणे हीच खरी आदरांजली आहे, असे चव्हाण यांनी स्पष्ट केले.



### 'अर्बन ट्रान्सफॉर्मेशन ग्रुप'

याच विचारांना पुढे नेत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या माध्यमातून 'अर्बन ट्रान्सफॉर्मेशन ग्रुप' अर्थात 'शहर परिवर्तन गट' उभारण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. राज्यातील वाढती शहरी लोकसंख्या, बदलत्या नागरी गरजा आणि महानगरांमधील वाढत्या समस्या लक्षात घेऊन शहरी प्रश्नांवर संघटितपणे काम करण्याची काँग्रेसची भूमिका आहे.

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सूचनेनुसार हा उपक्रम राबविण्यात येत असून, राज्यातील विविध महानगरपालिका क्षेत्रांमध्ये हा गट कार्यरत राहणार आहे. राजीव गांधींच्या आधुनिक भारताच्या संकल्पनेचा खरा अर्थ म्हणजे बदलत्या काळानुसार देश आणि शहरे पुढे नेणे. आज शहरांपुढे निर्माण होणाऱ्या नव्या समस्या समजून घेऊन त्यावर आधुनिक आणि शाश्वत उपाय शोधण्याची गरज आहे. 'अर्बन ट्रान्सफॉर्मेशन ग्रुप'च्या माध्यमातून अहिल्यानगरसह राज्यातील शहरांच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्याचा काँग्रेसचा प्रयत्न राहील, असे दीप चव्हाण यांनी सांगितले.

## दखल

### विधानमंडळ सदस्यांच्या स्वीय सहाय्यक आणि वाहनचालकांच्या मानधनात वाढ

**पुणे :** महाराष्ट्र विधानमंडळाच्या विद्यमान सदस्यांच्या स्वीय सहाय्यक आणि वाहनचालकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार स्वीय सहाय्यकांचे मासिक मानधन ३० हजार रुपयांवरून ४० हजार रुपये, तर वाहनचालकांचे मासिक मानधन २० हजार रुपयांवरून ३० हजार रुपये करण्यात आले आहे. ही वाढ दि. १ ऑगस्ट २०२६ पासून लागू करण्यात आली असल्याची माहिती संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली. मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ मधील तरतुदींनुसार विधानमंडळाच्या विद्यमान सदस्यांना त्यांचे विधिमंडळाचे प्रशासकीय कामकाज अधिक परिणामकारकपणे पार पाडण्यासाठी स्वीय सहाय्यकांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. विधानमंडळ सदस्यांच्या वेतन व भत्ते संयुक्त समितीच्या शिफारशीनुसार स्वीय सहाय्यकांच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने स्वीय सहाय्यक आणि वाहनचालकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

### चाकण परिसरात ३६.५ एकरांवर घनकचरा प्रकल्प




**चाकण :** चाकण औद्योगिक वसाहत आणि परिसरातील घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी पीएमआरडीएमार्फत मध्यवर्ती घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येणार आहे. चाकण व राजगुरुनगर नगरपरिषदांसह १७ ग्रामपंचायती अशा १९ स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी हा प्रकल्प असणार आहे. चाकण एमआयडीसीतील पॉइंट क्रमांक ४ येथे ईएसआरजवळील ३६.५० एकर जागा प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आली आहे.

एमआयडीसीकडून प्रकल्पासाठी जागा उपलब्ध करून दिली जाणार असून, पीएमआरडीएमार्फत प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार आहे. प्रस्तावित केंद्रापासून सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांची ठिकाणे २० किलोमीटरच्या आत असल्याने कचरा वाहतूक सुलभ होणार आहे.पुढील ३० वर्षांतील लोकसंख्यावाढीचा विचार करून प्रकल्पाची क्षमता निश्चित केली जाणार आहे. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना कचरा संकलन, १०० टक्के वर्गीकरण करून तो प्रक्रिया केंद्रापर्यंत पोहोचवावा लागणार आहे. प्रकल्पात सहभागी होण्यासाठी ग्रामपंचायतींना ठराव मंजूर करावा लागणार आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी कचरा वाहतुकीसाठी १५वा वित्त आयोग, स्थानिक स्वनिधी किंवा सीएसआर निधीतून वाहने उपलब्ध करून देण्याचे नियोजन असल्याचे सांगितले. निधीअभावी वाहने खरेदी न करू शकणाऱ्या ग्रामपंचायतींना सीएसआरमधून वाहने उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी आणि खेड-आळंदीचे आमदार बाबाजी काळे यांच्या उपस्थितीत याबाबत बैठक झाली. या बैठकीस संबंधित अधिकारी, सरपंच आणि ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते.

### विद्यार्थिनींच्या आरोग्यासाठी शाळेत सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशीन

**आळंदी :** विद्यार्थिनींच्या आरोग्य व स्वच्छतेला प्राधान्य देत शाळांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपरिषद प्रयत्नशील राहील, असे नगरसेविका तथा यात्रा विकास समितीच्या सभापती पूजा घुंडरे यांनी सांगितले.



आळंदी नगरपरिषद शाळा क्रमांक १ येथे विद्यार्थिनींसाठी सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशीन बसविण्यात आले. मंदिर समितीच्या ॲडव्होकेट रोहिणी पवार यांनी 'हर घर रोजगार फाउंडेशन'च्या माध्यमातून स्वखर्चातून हे मशीन उपलब्ध करून दिले. उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, नगरसेविका पूजा घुंडरे व फाउंडेशनच्या संस्थापक शिल्पा जाधव यांच्या हस्ते मशीनचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी पूजा घुंडरे यांनी मासिक पाळीच्या काळात स्वच्छता व आरोग्याची योग्य काळजी घेण्याचे आवाहन केले. आरोग्याशी संबंधित समस्या असल्यास विद्यार्थिनींनी पालक व शिक्षकांशी मोकळेपणाने संवाद साधावा, असेही त्यांनी सांगितले.

फाउंडेशनच्या संस्थापक शिल्पा जाधव व सुरेखा पिंपळकर यांनी मशीनचा वापर, सॅनिटरी पॅडची योग्य विल्हेवाट आणि वैयक्तिक स्वच्छतेबाबत विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास नगरसेवक सुनील घुंडरे, उद्योजक संजय घुंडरे, मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

### श्रावण सरींमध्ये रंगणार कवीसंमेलन



**सासवड :** श्रावण मासानिमित्त कऱ्हा सोशल फाउंडेशन आणि सिद्धेश्वर देवस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने सासवडसह पुरंदर तालुक्यातील नवोदित कवी व काव्यप्रेमींसाठी कवीसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवारी (३१ ऑगस्ट) दुपारी ३.३० वाजता निसर्गरम्य सिद्धेश्वर मंदिराच्या प्रांगणात हे कवीसंमेलन होणार आहे. सहभागी कवींना प्रमाणपत्र, तसेच उत्कृष्ट रचना सादर करणाऱ्या कवींना विशेष भेट देण्यात येणार आहे. तालुक्यातील कवी मंडळींनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या प्रतिभेला वाव द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कवींनी २८ ऑगस्टपूर्वी नावनोंदणी करावी. नावनोंदणीसाठी गणेश मुळीक (९९२१८३८६४८) किंवा हेमंत ताकवले (९८५०२२८२१७) यांच्याशी संपर्क साधावा.

# बंदी बांधवांच्या हातून साकारतोय बाप्पा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** कारागृहातील बंदी बांधवांच्या कलागुणांना वाव देत त्यांच्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी महाराष्ट्र कारागृह प्रशासनाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात आहेत. याच उपक्रमाचा भाग म्हणून यंदा बंदी बांधवांच्या हातून पर्यावरणपूरक शाडू मातीच्या गणेशमूर्ती साकारण्यात आल्या आहेत.



महाराष्ट्र कारागृह प्रशासन, भोई प्रतिष्ठान-पुणे आणि आदर्श मित्र मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रेरणापथ' उपक्रमांतर्गत गणेशमूर्ती निर्मितीचे प्रशिक्षण देण्यात आले.

या माध्यमातून बंदी बांधवांमधील कलागुणांना प्रोत्साहन देतानाच आत्मविश्वास वाढविणे, प्रायश्चित्ताची भावना सकारात्मक कृतीत बदलणे आणि समाजाच्या मुख्य प्रवाहाशी पुन्हा नाते जोडणे हा उद्देश आहे.

जगप्रसिद्ध शिल्पकार विवेक खटावकर, विराज खटावकर, पुंडलिक खलोलकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मूर्तीकलेचे प्रशिक्षण दिले. प्रशिक्षणातून सुबक व आकर्षक गणेशमूर्ती तयार झाल्या असून, नागरिकांनी या मूर्तींची खरेदी करून उपक्रमाला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

कारागृह सुधार सेवा विभागाचे अपर पोलीस महासंचालक डॉ. सुहास वारके, कारागृह विभागाचे महानिरीक्षक योगेश देसाई, येरवडा मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक सुनील ढमाळ आणि अतिरिक्त अधीक्षक पल्लवी कदम यांनी नागरिकांनी या गणेशमूर्ती भक्तिभावाने स्वीकाराव्यात, असे आवाहन केले.

या पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची विक्री गायत्री क्लिनिक, खडक माळ, राष्ट्रभूषण चौक, शिवाजी रोड, पुणे येथील स्टॉलवर सुरू आहे. बाप्पाच्या मूर्तीसोबत परिवर्तनाची आशाही घरोघरी पोहोचावी, हा या उपक्रमाचा मुख्य संदेश आहे.

## सीईए नियम व तांत्रिक मानकांवर पुण्यात एकदिवसीय कार्यशाळा

### महापारेषण आणि केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचा संयुक्त उपक्रम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या नियमावली व तांत्रिक मानकांबाबत वीज क्षेत्रातील भागधारकांना अद्ययावत माहिती देण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) आणि केंद्रीय विद्युत प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने प्रादेशिक स्तरावरील एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन येत्या शनिवारी (दि. २२) पुणे येथे हिंजवडी तील हिल्टन गार्डन इन येथे करण्यात आले आहे.

वीज क्षेत्रातील विविध भागधारकांना सीईएच्या नवीन नियमावली व तांत्रिक मानकांची माहिती देणे, नियामक तरतुदींचे प्रभावी पालन, विद्युत वाहिन्या व उपकेंद्रांच्या बांधकामासाठीची तांत्रिक मानके, विद्युत सुरक्षा तसेच ग्रिड कनेक्टिव्हिटीशी संबंधित बदलत्या मानकांबाबत मार्गदर्शन करणे हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव आभा शुक्ला (भा.प्र.से.) आणि भारत सरकारचे सदस्य (थर्मल), सदस्य (ई ॲन्ड सी) तथा पदसिद्ध अतिरिक्त सचिव प्रवीण गुप्ता यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी महापारेषणचे संचालक (संचलन),. सतीश चव्हाण, एनपीसीच्या सदस्य सचिव ऋषिका शरण, डब्ल्यूआरपीसीचे सदस्य सचिव. दीपक कुमार आणि सीईएचे मुख्य अभियंता . एल. के. एस. राठोड हे मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यशाळेतील तांत्रिक सत्रांमध्ये सीईएच्या नियमावली व त्यांचे अनुपालन, विद्युत वाहिन्या व उपकेंद्रांच्या बांधकामासाठीची तांत्रिक मानके, सेफ्टी ॲन्ड इलेक्ट्रिक सप्लाय रेग्युलेशन-२०२३ तसेच ग्रिड कनेक्टिव्हिटी रेग्युलेशन-२०२६ संदर्भातील मसुदा तांत्रिक मानके आणि वितरित निर्मिती साधनांच्या ग्रिड कनेक्टिव्हिटीसंदर्भातील प्रस्तावित तांत्रिक मानकांवरही मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

वीज क्षेत्रातील वाढत्या सायबर सुरक्षेच्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय विद्युत प्राधिकरण (वीज क्षेत्रातील सायबर सुरक्षा) नियमावली-२०२६ या विषयावर विशेष सत्र आयोजित करण्यात आले आहे. याशिवाय पारेषण क्षेत्रातील उत्तम नियामक कार्यपद्धती या विषयावर महापारेषणच्या वतीने विशेष सत्र घेण्यात येणार आहे.

कार्यशाळेच्या समारोपात प्रश्नोत्तर व अभिप्राय सत्र आयोजित करण्यात आले आहे. या कार्यशाळेमुळे वीज क्षेत्रातील विविध भागधारकांना नियामक आवश्यकतांची सुस्पष्ट माहिती मिळण्यास, अनुपालन व सुरक्षा पद्धती अधिक सक्षम करण्यास तसेच पारेषण क्षेत्रातील भविष्यातील तांत्रिक आणि सायबर सुरक्षा आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्जता वाढविण्यास मदत होणार आहे.

## प्रतिगामी शक्तींविरोधात पेटून उठण्याची गरज : उल्हास पवार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** संविधानाचा अवमान करणाऱ्या जातीयवादी प्रवृत्तींच्या विरोधात सामाजिक समतेसाठी सर्वांनी पेटून उठण्याची गरज आहे, असे मत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास पवार यांनी व्यक्त केले.

भारतीय संविधान संवर्धन समितीच्या वतीने भारतीय संविधान तसेच काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्या अवमानाचा निषेध करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी उल्हास पवार, माजी आमदार जयदेव गायकवाड, काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे पुणे (पूर्व विभाग) शहराध्यक्ष व आंदोलनाचे मुख्य समन्वयक कुणाल राजगुरू, माजी नगरसेविका लता राजगुरू, विठ्ठल गायकवाड, शैलेंद्र मोरे, संग्राम रोहम, वसंत साळवे, रोहिदास गायकवाड, रवींद्र माळवदकर यांच्यासह सर्वपक्षीय नेते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्तराखंडातील हलदानी येथील रामलीला मैदानावर विजय शंखनाथ रॅलीच्या कार्यक्रमासाठी मल्लिकार्जुन खर्गे उपस्थित होते. कार्यक्रमानंतर काही जातीयवादी शक्तींनी गोमूत्र शिंपडून मैदान पवित्र केल्याचा दावा केला. या कथित प्रकाराचा निषेध करण्यासाठी आंदोलन करण्यात आले.




उल्हास पवार म्हणाले, खर्गे यांनी लहानपणापासून सामाजिक विषमतेचे चटके सोसले. त्यांच्या कुटुंबातील पाच जणांना जाळून मारण्यात आले. तरीही त्यांनी संघर्षातून मोठे कर्तृत्व गाजवले. ते विद्वान, बहुभाषिक आणि घटनात्मक पदावर कार्यरत असताना केवळ दलित असल्यामुळे त्यांचा अवमान करणे सहन केले जाणार नाही.

माजी आमदार जयदेव गायकवाड म्हणाले, काँग्रेसने स्थापनेपासून सामाजिक समतेचा पुरस्कार केला आहे. स्वातंत्र्यानंतर अस्पृश्यता निर्मूलनाला प्राधान्य देण्यात आले. काँग्रेस हा पुरोगामी विचारांचा पक्ष असून सध्याच्या काळात सत्तारूढ भाजपला काँग्रेस हाच प्रभावी पर्याय ठरू शकतो. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना जनतेने पाठबळ देण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

## परमिटधारक चालकांना मराठीचे ज्ञान अनिवार्य

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**भाषाचाचणी उत्तीर्ण होणे बंधनकारक**

**पुणे :** महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाने महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये महत्वपूर्ण सुधारणा केली आहे. त्यानुसार इलेक्ट्रॉनिक मीटर बसविलेल्या वाहनांच्या परमिटधारकांसह संबंधित वाहनचालकांना मराठी भाषेचे कार्यज्ञान असणे आवश्यक करण्यात आले आहे.

संबंधित चालकाकडे मराठी भाषेचे आवश्यक ज्ञान नसल्याचे आढळून आल्यास, परवाना प्राधिकरणाकडून त्याला मराठी भाषेचे ज्ञान संपादन करण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात येईल. या मुदतीत चालकाने आवश्यक भाषाज्ञान संपादन न केल्यास, कारणे दाखवा नोटीस बजावून त्याच्या वाहनचालक परवान्यावरील अधिकृतता (Badge/ Authorisation) ३ महिन्यांपर्यंत निलंबित करण्यात येईल. त्यानंतरही नियमांचे पालन न झाल्यास अधिकृतता (Badge) रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

तसेच, वाहनाच्या परमिट नूतनीकरणाच्या वेळी परमिटधारकाचे मराठी भाषेचे ज्ञान प्राधिकरणाच्या समाधानाप्रमाणे असणे आवश्यक राहणार आहे.

संबंधित परमिटधारकांची मराठी भाषेची ज्ञानचाचणी प्रादेशिक परिवहन कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षकांमार्फत घेण्यात येणार आहे. ही चाचणी उत्तीर्ण होणे संबंधित परमिटधारकांसाठी अनिवार्य राहणार आहे. सदर नियम महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील असाधारण भाग चार-अमध्ये दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

## भुलेश्वर विद्यालयास विविध संस्थांकडून शैक्षणिक साहित्याची देणगी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** श्री भुलेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्री भुलेश्वर विद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष अरुण यादव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पंचायत समिती सदस्य माऊली यादव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात विद्यालयाच्या शैक्षणिक व भौतिक विकासासाठी योगदान देणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

स्व. जयवंतराव गद्रे यांच्या कुटुंबीयांनी विद्यालयासाठी सुसज्ज व्यासपीठ बांधून दिले आहे. भाऊसो कुमाजी यादव गेल्या दहा वर्षांपासून शालेय स्टेशनरी तसेच सात दत्तक विद्यार्थ्यांना वह्या, गणवेश, शूज व परीक्षा शुल्कासाठी मदत करीत आहेत. ब्राह्मण महासंघ पुणे यांच्या माध्यमातून चैतन्य जोशी यांनी यावर्षी विद्यार्थ्यांना १,५०० फुलस्केप वह्यांचे वाटप केले. अक्षरसृष्टी संस्थेच्या माध्यमातून सिद्धनाथ पवार व संस्थेचे अध्यक्ष अरुण यादव यांच्या सहकार्याने इयत्ता दहावीच्या ४० विद्यार्थ्यांना सोलर लॅम्प देण्यात आले. सुरज वर्मा ज्वेलर्स, पाषाण, पुणे यांच्या वतीने राजेंद्र गद्रे यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय शूज व सॉक्स उपलब्ध करून देण्यात आले. पर्सिस्टंट फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने दौलत कुंभार यांच्या माध्यमातून विद्यालयास तीन टेबल व तीन सिंक देण्यात आले. विद्यालयाचे माजी विद्यार्थी विनोद वाल्हेकर यांनी १३ संगणकांसह संगणक प्रयोगशाळा, प्रिंटर, राऊटर, वाय-फाय व विद्युत फिटिंगची सुविधा उपलब्ध करून दिली. शिक्षिका म्हाळगी यांनी शाळेत प्रथम आलेल्या तीन विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक हजार रुपयांचे बक्षीस दिले असून हार्मोनियमसाठी ११ हजार रुपयांची मदत केली. नवनाथ ईश्वरे व युवराज जाधव यांच्याकडून प्रत्येकी एक हार्मोनियम देण्यात येणार आहे. या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध होत असून विद्यालयाच्या प्रगतीला चालना मिळत आहे. कार्यक्रमास सरपंच आरती यादव, एकनाथ यादव, बाळू यादव, बबन यादव, मुबारक शेख, लक्ष्मण यादव, दशरथ यादव, किसन यादव, संस्थेचे सचिव विश्वास चव्हाण, ग्रामसेवक, तलाठी, ग्रामपंचायत सदस्य, संस्थेचे संचालक, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## रोहन दोरगे यांचा राज्यस्तरीय गुणगौरव पुरस्काराने सन्मान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** यवत (ता. दौंड) येथील हेरिटेज स्कूल यवतचे चेअरमन रोहन कैलास दोरगे यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत राज्यस्तरीय सनक्रिस्टल गुणगौरव पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले. सनक्रिस्टल सोशल अँड एज्युकेशनल फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने बारामती येथील तथास्तु हॉटेल, भिगवण रोड येथे हा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात झाला.

महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा यावेळी गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन सनक्रिस्टल सोशल अँड एज्युकेशनल फाउंडेशनचे चेअरमन डॉ. संतोष मंगलाई सदाशिव मचाले यांनी केले. यावेळी चंदूकाका सराफ प्रा. लि.चे चेअरमन किशोरकुमार शहा, सुप्रसिद्ध कायदेतज्ज्ञ सुधीर पाटसकर, प्रसिद्ध मेडिकल व क्रोनिक पेन कन्सल्टंट डॉ. कीर्ती सतीश पवार तसेच सनक्रिस्टल फाउंडेशनचे सचिव दिलीप राळेगावकर उपस्थित होते.

रोहन दोरगे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न केले असून ग्रामीण भागातील युवकांसाठी रोजगारनिर्मितीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठीही ते कार्यरत आहेत. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी वृक्षारोपण, रक्तदान शिबिरे आणि विविध सामाजिक उपक्रमांत सक्रिय सहभाग घेतला आहे. हा पुरस्कार त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची राज्यस्तरीय पावती मानली जात असून, या सन्मानाबद्दल कुटुंबीय, मित्रपरिवार, सहकारी व हितचिंतकांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.हा सन्मान माझ्या कार्याची जबाबदारी वाढवणारा असून विद्यार्थी आणि समाजहितासाठी अधिक समर्पितपणे कार्य करण्याची नवी ऊर्जा देणारा आहे, असे रोहन कैलास दोरगे, चेअरमन, हेरिटेज स्कूल यवत यांनी सांगितले.

## सीओईपीच्या सुधारित शुल्क रचनेचा विद्यार्थ्यांना लाभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाच्या शिक्षण शुल्क परतावा योजनेचा अधिकाधिक लाभ मिळावा, यासाठी शुल्क रचनेत सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या निर्देशानुसार विद्यापीठ प्रशासनाने ही कार्यवाही सुरू केली आहे.

या संदर्भात १८ ऑगस्ट रोजी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या दालनात अपर मुख्य सचिव रेड्डी तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी जाहीर केलेल्या शुल्क रचनेचा आढावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांच्या मागण्या आणि शासनाची उच्च शिक्षण सर्वसामान्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची भूमिका लक्षात घेऊन शुल्क रचनेत फेरबदल करण्याचे निर्देश देण्यात आले.

शुल्क नियामक प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी सुधारित शुल्क रचना करण्यात येणार आहे. यामध्ये शुल्क रचनेतील 'इतर शुल्क' शैक्षणिक शुल्कामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही केली जाणार आहे.

या निर्णयाचा विशेष लाभ इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती व भटक्या जमाती, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील विद्यार्थ्यांना होणार आहे. सुधारित शुल्क रचनेमुळे शासनाच्या शिक्षण शुल्क परतावा योजनेचा अधिकाधिक लाभ विद्यार्थ्यांना मिळण्यास मदत होणार आहे.विद्यार्थ्यांच्या हितासाठी शुल्क रचनेत सुधारणा करण्याबाबत मार्गदर्शन व निर्देश दिल्याबद्दल सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ प्रशासनाने राज्य शासनाचे आभार मानले आहेत.

## ई पिंक-रिक्षा योजनेच्या अनुदानात दुप्पट वाढ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांचे आर्थिक सक्षमीकरण तसेच त्यांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'ई पिंक -रिक्षा योजने' अंतर्गत शासन अनुदानात वाढ करण्यात आली आहे. यापूर्वी ई-रिक्षा खरेदीसाठी मिळणारे २० टक्के शासन अनुदान आता ४० टक्के करण्यात आले आहे.

महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार योजनेतील अनुदानाचा हिस्सा २० टक्क्यांवरून ४० टक्के करण्यात आला आहे. त्यामुळे नव्याने पात्र ठरणाऱ्या लाभार्थी महिलांना ई-रिक्षाच्या किमतीच्या ४० टक्के शासन अनुदानाचा लाभ मिळणार आहे.

**जाहीर आवाहन**

सर्व लोकांना कळवण्यात येते की, प्रकाश माणकचंद खाबिया , राहणार आनंदनगर, गट नंबर २४६८/१/२४७०, फ्लॅट नंबर क - ३०७, आंबेठाण चौकाजवळ, चाकण, तालुका खेड, जिल्हा पुणे - ४१०५०१.

यांचे २७.०३.२०२६ रोजी निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे वाहन चक-१४-एउ- ४६११ असे असून त्याचा इंजिन नंबर घ१०इछ७२९५८२९, चासीस नंबर, चअ३एथूए१ड००६३५०३७ असा असून सदर चार चाकी वाहन त्यांचे कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती पद्मा प्रकाश खाबिया यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, आठ दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी .
दिनांक - २१/०८/२०२६

**श्रीमती पद्मा प्रकाश खाबिया**
**फ्लॅट नंबर अ ३०२, रॉयल ऑरेंज काउंटी, फाउंटेन इन हॉटेल मागे, शिवराज नगर, रहाटणी, पुणे - ४११०१७**

## चाकण परिसरातील उद्योगांच्या तक्रारी निवारणासाठी 'उद्योग तक्रार निवारण कक्ष'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** चाकणसह पुणे जिल्ह्यात नवीन उद्योग तसेच ग्लोबल कॅपॅबिलिटी सेन्टर्स (GCCs) मोठ्या प्रमाणावर येत आहेत. या पार्श्वभूमीवर विविध शासकीय विभागांकडून आवश्यक मंजुरी, परवानग्या आणि सेवा मिळविताना उद्भवणाऱ्या प्रलंबित बाबींचे जलद निराकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे 'उद्योग तक्रार निवारण कक्ष' स्थापन करण्यात आला आहे. चाकण परिसरातील रस्ते दुरुस्ती, वाहतूक कोंडी निवारण आणि वाहतूक व्यवस्थापनासाठी महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाच्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. उद्योगांशी संबंधित कोणतीही तक्रार अथवा समस्या असल्यास नागरिक, उद्योजक आणि संबंधित घटकांनी ०२०-२६१३००९७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच तक्रारी collector.punemaharashtra.gov.in या ई-मेलवर पाठवाव्यात.

तक्रार दाखल करताना तक्रारीचे स्वरूप, संबंधित उद्योगाचे नाव, संपर्क क्रमांक तसेच आवश्यक कागदपत्रे किंवा उपलब्ध माहिती सोबत सादर करावी. यामुळे प्राप्त तक्रारींची तातडीने दखल घेऊन संबंधित विभागांशी समन्वय साधत कार्यवाही करणे शक्य होणार आहे.

चाकण परिसरासह पुणे जिल्ह्यातील उद्योगांना शासकीय सेवा व परवानग्या मिळविताना येणाऱ्या अडचणींचे प्रभावी आणि वेळेत निराकरण करण्यासाठी हा कक्ष महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

द·ख·ल

## मुळा धरणातून उद्या डाव्या उजव्या कालव्यासह वांबोरी चारीला पाणी सुटणार : आ. कर्डिले



**शिराळ चिचोंडी :** पावसाचे प्रमाण अतिशय कमी असल्यामुळे दुष्काळ दृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. मुळा धरणातून वांबोरी चारीसह डावा उजवा कालव्याला पाणी सोडण्याची मागणी लाभधारक शेतकऱ्यांनी आमदार अक्षयदादा कर्डिले यांच्याकडे केली. त्यानंतर आ. कर्डिले यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे मुळा धरणातून पाणी सोडण्याची मागणी विनंती केली. त्यानंतर मंत्री विखे पाटील यांनी देखील आ. कर्डिले यांच्या विनंतीला मान देऊन उद्या म्हणजे शुक्रवार दिनांक २१ ऑगस्ट रोजी मुळा धरणातून डावा उजवा कालव्यासह वांबोरी चारीला पाणी सोडण्याचा निर्णय झाला असून आ. अक्षय कर्डिले यांच्या पाठपुराला मोठे यश या निमित्ताने आले आहे. आज देखील काही लाभधारक शेतकऱ्यांनी आ. अक्षय कर्डिले यांची भेट घेऊन वांबोरी चारीला पाणी सोडण्याची विनंती केली आणि ती विनंती मान्य झाली असून उद्या मुळा धरणातून आता पाणी सोडले जाणार आहे. लाभधारक शेतकऱ्यांच्या वतीने देखील आ. अक्षय कर्डिले यांना पाणी सोडण्याचा निर्णय झाल्याबद्दल धन्यवाद दिले जात आहेत.

## श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत दैदिप्यमान यश



**श्रीगोंदा :** रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, बेलवंडीने उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता सातवी (२०२५-२६) मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत ३१.३७ टक्के निकाल नोंदविला आहे. एकूण १०३ विद्यार्थ्यांपैकी तब्बल ३२ विद्यार्थी पात्र ठरले असून, चार विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा अधिक गुण मिळवत शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे.यामध्ये शेख आलिया - २५२ गुण, वावरे अनुष्का - २४४ गुण, इधाटे अनुष्का - २२८ गुण आणि साळवे ईश्वरी - २२६ गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले.विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी इंग्रजी विषयासाठी श्रीमती ज्योती नरवडे, मराठी विषयासाठी बाळासाहेब ठोंबरे, गणितासाठी श्रीमती मधुवंती शिवगुडे आणि बुद्धिमत्ता विषयासाठी श्रीमती सुमती सुरसे यांनी मार्गदर्शन केले. गुरुकुल प्रमुख विलास लबडे, गुणवत्ता कक्ष प्रमुख बापू ओहोळ आणि पर्यवेक्षिका शामलम हरिभक्त यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण मार्गदर्शन मिळाले.शाळेचे उपमुख्याध्यापक श्री. बापूसाहेब दिघे आणि मुख्याध्यापक राजेंद्र खेडकर यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले. एकत्रित प्रयत्न, योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण मेहनतीचे फळ म्हणून या यशाकडे पाहिले जात आहे.

## ताजनापुर उपसा सिंचन योजनेमधून पाणी सोडण्याचे नियोजन : आ. राजळे

**शेवगांव :** ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक २ ता. शेवगांव या योजनेच्या लाभ क्षेत्रात उद्या शुक्रवार दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. पावसाचे प्रमाण अल्प



असल्याने दुष्काळी परिस्थितीमुळे टंचाई निर्माण झालेली आहे. ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा क्र. २ लाभ क्षेत्रातील पिकांना पाण्याची आवश्यकता असल्याने शेतकरी सिंचनासाठी पाणी सोडण्याची मोठया प्रमाणात मागणी करत असल्याने जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, यांचेकडे पाणी सोडणेसाठी पाठपुरावा करण्यात आला. त्यानुसार अहिल्यानगर मध्यम प्रकल्प विभागअंतर्गत ताजनापूर उपसा सिंचन योजनेत समाविष्ठ असलेल्या गावांना योजनेच्या मुख्य वितरणकुंड क्र. २ व ३ मधून सदर गावातील नदीपात्रात पाणी सोडून बंधारे व आऊटलेट द्वारे शेतीसाठी सिंचनास उद्या पासून पाणी सोडण्यात येणार आहे. त्याचबरोबर ठाकूर निमगांव व मळेगाव येथील क्षेत्र उंचावर असल्याने यांत्रिकी विभागामार्फत पॅनलची उभारणी व पंपाची जोडणी करून आठ दिवसात या भागात देखील पाणी सोडण्यात येणार असल्याचे आ. मोनिका राजळे यांनी सांगितले.

## 'ध्येय मोठे ठेवा, मेहनत प्रामाणिक करा'चा विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश



**पाथर्डी शहर :** ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षणाच्या बळावर यशाची नवी वाट निर्माण करणाऱ्या ड. नीलम बाळासाहेब साठे यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. त्यांच्या यशाचा गौरव करणारा हा सोहळा केवळ सत्कारापुरता मर्यादित न राहता ग्रामीण भागातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी संदेश देणारा ठरला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबुजी आव्हाड, डॉ. जी. पी. ढाकणे होते. कैलास दौंड, सीताराम बापू बोरुडे, प्रा. श्रीकांत काळोखे, प्रा. अशोक डोळस, हाजी हुमायुन आतार, ॲड. दगडखैर भाऊसाहेब, ॲड. आत्माराम वांढेकर, श्रीपाद बळीद, पप्पू शेठ बोर्डे, महेंद्र राजगुरू, संजय राजगुरू, योगेश जेधे, शिवाजी पवार, भीमराज शिंदे, विजय काळोखे, अंबादास दिनकर, रविन्द्र दिनकर यांच्यासह ड. नीलम साठे यांचे आई-वडील, कुटुंबीय व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी ड. नीलम साठे यांच्या यशाचे कौतुक करताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी परिस्थितीची मर्यादा न मानता शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन केले. ध्येय निश्चित करून त्यासाठी सातत्याने मेहनत घेतल्यास कोणतीही पार्श्वभूमी यशाच्या आड येऊ शकत नाही, हा विचार उपस्थितांनी मांडला. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी गुणवत्तावान असूनही योग्य मार्गदर्शन, संधी किंवा आत्मविश्वासाच्या अभावामुळे मागे राहतात. अशा विद्यार्थ्यांसाठी ड. नीलम साठे यांची वाटचाल निश्चितच आशेचा किरण ठरू शकते. 'आपण कुठून आलो यापेक्षा आपण कुठे पोहोचायचे हे महत्त्वाचे', या विचाराची जाणीव या कार्यक्रमातून करून देण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्ताविक राजर्षी छत्रपती शाहू महाराज पतसंस्थेचे चेअरमन दिगंबर गाडे यांनी केले. सूत्रसंचालन हाजी हुमायुन भाई आतार यांनी केले, तर प्रा. गौतम ढेकणे यांनी आभार मानले. मान्यवर, कुटुंबीय आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत झालेला हा सत्कार सोहळा शिक्षण, जिद्द आणि कर्तृत्वाचा गौरव करणारा ठरला.

# चिंभळा उपबाजार समितीत कांद्याची 'बंपर' आवक

### ७ हजार गोण्यांचा लिलाव : समाधानकारक भावामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साह

### लिलावानंतर तातडीने चेकद्वारे पेमेंट

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चिंभळा येथील उपबाजार समितीत गुरुवारी कांद्याची मोठी आवक झाली. आजच्या लिलावासाठी तब्बल ६ ते ७ हजार गोणी कांदा बाजारात दाखल झाला. विविध प्रतवारीच्या कांद्याला समाधानकारक भाव मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

चिंभळा उपबाजार समितीत दर सोमवार, गुरुवार आणि शनिवार कांद्याचे नियमित लिलाव होत असल्याने परिसरातील शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर हक्काची बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. त्यामुळे कांदा विक्रीसाठी दूरच्या बाजारपेठेत जाण्याचा वाहतूक खर्च आणि वेळ वाचत आहे.



चिंभळा उपबाजार समितीतील व्यवहाराचे वैशिष्ट्य म्हणजे लिलाव प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांना तातडीने चेकद्वारे पेमेंट केले जाते. त्यामुळे कांदा विकल्यानंतर पैशांसाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करण्याची वेळ शेतकऱ्यांवर येत नाही. लिलाव आणि पेमेंटची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने होत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

सध्या कांद्याच्या बाजारभावात चढ-उतार सुरू असल्याने शेतकऱ्यांनी एकाच वेळी मोठ्या प्रमाणात कांदा बाजारात आणण्याची घाई न करता उपलब्ध परिस्थितीचा अंदाज घेऊन टप्प्याटप्प्याने माल विक्रीस आणावा, असा सल्ला व्यापाऱ्यांनी दिला.

**गुरुवारी झालेल्या लिलावात कांद्याला मिळालेले दर पुढीलप्रमाणे**

सुपर गोळा : ४,००० ते ४,५०० प्रति क्विंटल
गोळा : ३,८०० ते ४,०००
मोकळा मोठा : ३,२०० ते ३,५००
मीडियम : ३,२०० ते ३,६००
गोल्टी : २,८०० ते ३,२००
लिलावानंतर तातडीने चेकद्वारे पेमेंट

**स्थानिक बाजारपेठ ठरतेय वरदान**

चिंभळा येथे उपबाजार समिती सुरू झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. स्थानिक बाजारपेठ उपलब्ध झाल्याने वाहतूक खर्च कमी झाला असून वेळेचीही बचत होत आहे. त्याचबरोबर शेतकरी, व्यापारी, हमाल आणि वाहतूकदारांची वाढलेली वर्दळ यामुळे चिंभळा परिसरातील स्थानिक व्यवसायालाही चालना मिळत आहे. चिंभळा उपबाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर सक्षम बाजारपेठ उपलब्ध करून दिल्याबद्दल शेतकरी वर्गाने कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, उपसभापती, संचालक मंडळ तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानले. भविष्यातही शेतकऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देत चिंभळा उपबाजार समितीची बाजारपेठ अधिक सक्षम करावी, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

### किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्षपद खेडकर यांनी नाकारले

## मतदारसंघात मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना प्रभावीपणे राबविणार : खेडकर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** भारतीय जनता पक्षाचे अशोक खेडकर यांची विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या शिफारशीनुसार भाजप किसान मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. मात्र, शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत खेडकर यांनी हे पद स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला आहे.

खेडकर यांची यापूर्वीच मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते समितीवर कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे एकाच वेळी दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळताना शेतकऱ्यांच्या प्रश्नांना अपेक्षित न्याय देता येणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली.



यावेळी रवींद्र चव्हाण, रामकृष्ण वेताळ, प्रभारी व आ. संजय कटे यांनी खेडकर यांच्या प्रदेश उपाध्यक्षपदाच्या निवडीची अधिकृत घोषणा केली होती. मात्र, पदापेक्षा शेतकऱ्यांचे प्रश्न महत्त्वाचे असल्याचे सांगत खेडकर यांनी हे पद मतदारसंघातील अन्य सक्षम कार्यकर्त्याला देण्यात यावे, अशी मागणी प्रा. राम शिंदे यांच्याकडे केली आहे.

अशोक खेडकर हे अनेक वर्षांपासून भाजपमध्ये सक्रिय असून त्यांनी जिल्ह्याचे जिल्हा उपाध्यक्ष जिल्हा परिषदेचे सदस्य पक्षाचे तालुकाध्यक्षपद भूषविले आहे. तसेच कर्जत तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांशी त्यांचा सातत्याने संपर्क राहिला आहे. किसान मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदापेक्षा मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेच्या माध्यमातून मतदारसंघातील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याला मी प्राधान्य देत आहे. माझ्यामुळे दुसऱ्या कार्यकर्त्याला संधी मिळत असेल तर ते पद त्याला मिळावे. त्या कार्यकर्त्यानेही पदाला न्याय द्यावा, यासाठी माझा प्रयत्न राहील, असे खेडकर यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

## स्वत:चे कर्तव्य पालन, म्हणजे राष्ट्र सेवा : डॉ. साठे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**तिसगाव :** सोशल मीडियावर माहितीचा लोंढा सारखा वाढत आहे. त्यामधून योग्य तो विचार व माहिती घेण्याची कुवत आपल्यामध्ये असावी. संपर्क, संवाद व समन्वय हे महत्त्वाचे मुद्दे आहेत. समाजात जगत असताना प्रत्येकाच्या कर्तुत्वावर देशाची स्थिती अवलंबून असते. प्रत्येकाने स्वत:चे कर्तव्य पालन करणे म्हणजे राष्ट्रसेवा करणे होय. एक वेळेस मार्क कमी मिळाले तरी चालतील परंतू व्यसनाच्या कधीही वाटेवर जाऊ नका असे प्रतिपादन डॉ. प्रशांत साठे त्यांनी व्यक्त केले.

सहकार महर्षी स्व. दादापाटील राजळे यांच्या १०४ व्या जयंती निमित्त, दादापाटील राजळे महाविद्यालय, ते बोलत होते. यावेळी उद्धवराव वाघ, अरविंद पारगावकर राहुल दादा राजळे, बाबासाहेब किलबिले, रामकिसन काकडे, संदीप लोखंडे, शेषराव कचरे, बाळासाहेब अकोलकर, श्रीकांत मिसाळ, भगवानराव साठे, सुभाषराव बुधवंत, सुरेश नेमाने, भास्करराव गोरे, महाजन साहेब, पोपटराव आंधळे, बि. आर. लवांडे, वसंतराव नेहुल, सचिन वायकर, अश्पाक शेख, सुनील पुंड आदी मान्यवरांसह परिसरातील पालक विद्यार्थी - विद्यार्थिनी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. आ. मोनिक राजळे यांनीही मुलांना मार्गदर्शन केले. मुलांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे व स्वत:बरोबरच समाजाचेही हित साधावे असे त्यांनी सांगितले. आदिनाथनगर, ता. पाथर्डी येथे, स्व. दादापाटील राजळे स्मृती व्याख्यानमाले गुरुवार दि. २० ऑगस्ट ते शनिवार २२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आयोजन करण्यात आलेले आहे. व्याख्यानमालेचे हे २१ वे वर्ष आहे. या व्याख्यानमालेचे उद्घाटन व पहिले पुष्प गुंफताना डॉ. प्रशांत साठे हे स्क्रीन टाईम ते ग्रीन टाईम या विषयावर बोलत होते. विद्यार्थी दशेत प्रत्येकाने आनंदमयी सार्थक छात्र जीवन जगणे आवश्यक आहे. रोजच्या कॉलेजच्या वेळेचे सार्थकता कशी करता येईल याचा विचार प्रत्येकाने करावा. स्क्रीन टाईम कमी करण्यासाठी बैठे खेळ, मैदानी खेळ, व्यायाम, वाचन, लेखन, छंद, सायकल चालवणे, असे विविध पर्यायी गोष्टींची निवड करावी असे यावेळी ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. राजधर टेमकर यांनी केले. आभार डॉ.गंगाधर लवांडे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.राजेंद्र इंगळे व डॉ. किशोरकुमार गायकवाड यांनी केले.

## वॉटरशेडच्या माध्यमातून ३६ हजार फळझाडांची लागवड



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**करंजी :** ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचा आधार मिळावा आणि शेतीमध्ये फळबाग लागवडीला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट आणि परम निश्चय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या 'नवजीवन प्रकल्पा' अंतर्गत नगर आणि पाथर्डी तालुक्यातील १५ गावांमध्ये ४० हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड करण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत विविध फळपिकांची तब्बल ३५ हजार ९८६ म्हणजेच सुमारे ३६ हजार फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. यामध्ये आंबा, पेरू, लिंबू, बोर, संत्रा आणि डाळिंब आदी फळझाडांचा समावेश आहे. प्रकल्प व्यवस्थापक मनोज कुमार जाधव म्हणाले कि पारंपरिक पिकांबरोबरच शेतकऱ्यांना दीर्घकालीन आणि शाश्वत उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध व्हावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.ज्या शेतकऱ्यांनी अद्याप कोणत्याच प्रकारची फळबाग लागवड केलेली नाही अशा शेतकऱ्यांना आम्ही निवडले असून त्यांना प्रशिक्षण दिले आहे. या प्रकल्पासाठी एकूण १४४ शेतकरी लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून, त्यांना फळबाग लागवड, झाडांची निगा, पाणी व्यवस्थापन, खत व्यवस्थापन तसेच रोग व किडींचे नियंत्रण याबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे. लागवडीनंतरही शेतकऱ्यांना आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन करण्यात येत असल्याचे जाधव यांनी सांगितले. 'नवजीवन प्रकल्पा'ची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी थजढठच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जात आहेत.

## स्वातंत्र्यदिनानिमीत्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी शहर :** स्वातंत्र्यदिनाचा उत्साह, विद्यार्थ्यांचा जल्लोष आणि एका आदर्श शिक्षकाच्या स्मृतींना भावपूर्ण अभिवादन, अशा त्रिवेणी संगमात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुत्तरवाडी येथे शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रभात फेरी, विद्यार्थ्यांची भाषणे, लेझीमवरील गीत, कवायत तसेच विविध उपक्रमांनी शाळेचा परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारून गेला. यावेळी महाराष्ट्र राज्य बाल चित्रकला राज्यस्तरीय स्पर्धेत शाळेतील चार विद्यार्थी बक्षीसपात्र ठरल्याबद्दल त्यांचा शाळेच्या वतीने गौरव करून बक्षिसे देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळालेल्या या प्रोत्साहनामुळे शाळेतील वातावरणात विशेष आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

याच कार्यक्रमात आदर्श शिक्षक कै. साहेबराव गहिनीनाथ दहिफळे यांची ३० वी पुण्यतिथी भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास भगवान दहिफळे, रामेश्वर लोटके, देविदास दहिफळे, बाळासाहेब दहिफळे, द्वारकानाथ दहिफळे, बाबासाहेब दहिफळे, किशोर नागरे, उद्धव ढाकणे, दत्तात्रय दहिफळे, निवृत्ती दहिफळे, बबन दहिफळे, सुनील वनवे, संतोष गोसावी, कार्तिक जायभाये, भगवान जायभाये यांच्यासह अंगणवाडी सेविका मंगलताई वनवे, अरुणा दहिफळे, छायाताई गोसावी, सुनीता दहिफळे, राणी जायभाये, विविध गटांच्या अध्यक्षा, आशा वर्कर तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.



## केदार वाचनालयाचे कार्य कौतुकास्पद : धस

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**करंजी :** कैलासवासी गुरुवर्य केदार सार्वजनिक वाचनालयाचे कार्यकर्तुकास्पद असल्याचे प्रतिपादन पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुरेश धस यांनी केले. हत्राळ-सैदापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित कार्यक्रमात पंचायत समितीचे गट विकास अधिकारी राजेंद्र धस यांचे हस्ते शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी ओमप्रकाश दहिफळे,सुभाष केदार आदि उपस्थित होते. कै. गुरुवर्य विठ्ठलराव केदार सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने सुभाष केदार यांच्या हस्ते इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट दर्जाचे शैक्षणिक साहित्य व दप्तरांचे वाटप करण्यात आले. मुलींसाठी सौंदर्यप्रसाधने, तर शिक्षकांसाठी पेनचे वाटप करण्यात आले. वाचनालयाच्या वतीने यापूर्वीही शाळेसाठी सिमेंट बाके, पेपर स्टँड तसेच नियमित वृत्तपत्रे उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करताना गटविकास अधिकारी राजेंद्रजी धस यांनी कै. गुरुवर्य विठ्ठलराव केदार सार्वजनिक वाचनालयाच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शाळेच्या गुणवत्तेबद्दल मुख्याध्यापक उल्हास बटुळे व सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले. मुख्याध्यापक उल्हास बटुळे यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करून आभार मानले. यावेळी हत्राळ व सैदापूर ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, आरोग्य सेवक, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष, ग्रामस्थ तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते.

# सत्य, निष्ठा, श्रद्धा व सेवा यातूनच कल्याणाचा मार्ग : माधव बाबा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी तालुका :** दुर्गाष्टमी उत्सवानिमित्त शंकर महाराज मठामध्ये राज्यातील विविध भागातून भाविकांची दिवसभर वर्दळ राहिली. गेल्या १४ वर्षांपासून अष्टमी उत्सव येथे मोठ्या प्रमाणात साजरा होतो. अहिल्या नगर, पुणे, संभाजीनगर, बीड, नाशिक या भागातूनही भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहिल्यानगरचे भाविक बाळासाहेब पानसरे यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात आला. पहाटे शंकर महाराज यांच्या मूर्ती व पादुकावर जलाभिषेक करण्यात येऊन त्यानंतर नित्य पाठ, सकाळी आरती व दुपारी मान्यवरांच्या हस्ते महाआरती संपन्न होऊन महाप्रसाद देण्यात आला. विविध मान्यवरांनी माधव बाबांचे शंकर महाराज स्वरूपात पूजन केले.

यावेळी भाविकांना उपदेश करताना माधव बाबा म्हणाले, सत्य, निष्ठा, दैनंदिन जगण्यासह घर व्यवसायाची जागा, श्रद्धास्थाने, मंदिरे, येथील स्वच्छता सुद्धा ईश्वरी कृपा प्राप्त करण्यासाठी सहाय्यभूत ठरते. मोठा डामडौल, दिखाऊपणा या गोष्टीला धर्म मान्य करत नाही. त्यामधून केवळ आपली मिरवून घेण्याची हौस पूर्ण होते. अशी सेवा ईश्वराला, समाजाला सुद्धा मान्य होत नाही. अंतकरणातून ईश्वरी सेवेची ओढ निर्माण व्हावी लागते. या सेवेच्या माध्यमातून सर्वसंग परित्यागाची भावना वाढीस लागते. संपूर्ण जगत



नश्वर आहे, आपली चल अचल संपत्ती सुद्धा नश्वर आहे. आपल्या सानिध्यात असलेली आपले नातेवाईक, कुटुंबीय, यांचे आपले ऋणानुबंध संपल्यानंतर त्यांचा व आपला वियोग होणार आहे. नियतीने कपाळावर लिहिलेले आयुष्य पूर्ण झाल्यानंतर शरीराचा व आत्म्याचा सुद्धा वियोग होतो. मग या जगात नेमके आपले काय आहे, असा विचार ज्यावेळी आपण करतो, त्यावेळी फक्त आपली कर्म हीच आपल्याबरोबर शेवटपर्यंत येतात. या कर्माच्या माध्यमातून आपले भाग्य ठरते. म्हणून सत्कर्म, सत्संग, सदविचार अशा गोष्टीतून जीवन जगताना पदोपदी सेवा भाव जपला जावा. हातून सत्कृत्य, ईश्वरी सेवा घडावीत. सर्वसामान्य माणसांना मदतीची भावना निर्माण व्हावी, निसर्ग, पशुपक्षी, प्राण्यांची सेवा घडवी. कारण मनुष्य जन्म हा सेवा कार्यातून जीवनोद्धार करण्यासाठी मिळालेला आहे. आपण कशाकरता जन्म घेतला, या भूतलावर आपले नियत कार्य काय आहे, याची जाणीव संत कृपेच्या माध्यमातून होते. या सृष्टीमध्ये प्रत्येक जीव जंतू सह मनुष्य प्राणी कुठल्यातरी कार्यासाठी जन्माला आला असला तरी इतर इतर प्राण्यांपेक्षा मनुष्यजन्म हा केवळ सेवा, परोपकार व धर्म रक्षणासाठी आहे. अन्य कुठल्याही जन्मात उद्धाराचा मार्ग नाही. त्या सर्व भोगयोनी आहेत. त्यामुळे संत संगती, धर्मविचार व धर्माची कास धरूनच आपल्याला ईश्वरी स्वरूपाची जाणीव करून घ्यायची आहे. शंकर महाराजांनी आपल्या प्रचंड आध्यात्मिक शक्तींद्वारे साधकांना वेळोवेळी विविध रूपामध्ये दर्शन देत मार्गदर्शन केले. त्यांचे दर्शन झाले, त्यांच्या सेवेतून विविध समस्यांचे निराकरण झाले, संकटे दूर झाली, असे सांगणारे भाविक आजही मोठ्या संख्येने आहेत. तरीही शंकर महाराजांची सेवा सकाम भावनेने करण्यापेक्षा निष्काम भावनेने सेवा करा. महाराज आपल्यातच आहे, याची प्रचिती अतिशय शीघ्र गतीने मिळते. अष्टमी उत्सव हा त्याचेच प्रतीक असून अंधकाराचा नाश व प्रकाशाची तीव्रता वाढवणारी शुद्ध पक्षातील ही स्थिती असते. सर्वसृष्टीमध्ये अष्टमी पासून पौर्णिमे पर्यंत वेगळेच चैतन्य, सकारात्मक भाव व कल्याणकारी शक्तींचे प्राबल्य वाढत असते. या शक्तींचे संचालन व नियंत्रण शंकर महाराजांसारख्या सिद्ध पुरुषांकडून होऊन साधकांना साधनेच्या माध्यमातून मार्गदर्शन होते.

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार दि.२१ ऑगस्ट २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८


## डांबराचा दुष्काळ आणि ट्रम्प तात्यांचा 'बॉम्ब' प्रयोग

### अहिल्यानगरच्या राजकारणात डांबराचे शितयुद्ध

अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री



**शिर्डी** : अमेरिकेने पुकारलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या क्रूड तेलाच्या आणि रिफायनरीच्या तुटवड्याचा थेट परिणाम भारतामधील रस्त्यांच्या कामांवर झाला आहे. नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडियाच्या डांबरीकरणाच्या कामांना यामुळे डांबर मिळणे कठीण झाले असून, या तुटवड्याला अमेरीकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प जबाबदारअसल्याची प्रतिक्रिया मा खा डॉ. सुजय विखे यांनी दिली होती.

या वक्तव्यावरून नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके, भाजपचे नेते राजेंद्र पिपाडा आणि शिर्डी शहर काँग्रेसचे चौगुले यांनी डॉ विखे यांच्या वक्तव्यावर टीकेची झोड उठवली होती. राहता काँग्रेस कमिटीच्या वतीने थेट अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना 'डांबर द्या तात्या' असे आशयाचे पत्र पाठवून अनोखे आंदोलन केले होते. या आरोप-प्रत्यारोपामुळे जिल्ह्याचे राजकारण चांगलेच ढवळून निघाले होते. मी केलेल्या वक्तव्याचा बाऊ केला जात आहे म्हणत विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर देण्यासाठी डॉ. सुजय विखे यांनी काल शिर्डीत पत्रकार परिषद घेत आपण आपल्या वक्तव्यावर ठाम असल्याचे त्यांनी सांगितले. देशातील नामांकित वृत्तपत्रांमधील बातम्यांचे दाखले आणि पुरावे सादर केले.

इराण, इराक, बहारीन आणि युएई या देशांकडून भारतामध्ये प्रामुख्याने डांबर आयात केले जाते. मात्र, युद्धजन्य परिस्थितीमुळे क्रूड कंपन्या पूर्ण क्षमतेने चालत नसल्याने डांबराची तीव्र कमतरता भासत असल्याचे त्यांनी यावेळी पुराव्यानिशी स्पष्ट केले. आपण केलेले वक्तव्य शंभर टक्के खरे कसे आहे हे तंतोतंत पटवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. यावेळी त्यांनी टिका करणाऱ्या महा विकास आघाडीच्या नेत्यांना लक्ष करत मुद्दे आणि गुद्दे देत त्यांचा अभ्यास कच्चा असल्याचा निशाना साधला.

मात्र या रस्त्याच्या अडखलेल्या कामाशी थेट अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचा संबंध आल्याने हा विषय जागतीक पातळीवर पोहोचल्याने या आरोप प्रत्यारोपांना विषेश महत्व प्राप्त झाले. आता या ट्रम्प प्रकरण जिल्ह्याच्या राजकारणात किती दिवस चालते हे पहाणे औत्सुक्याचा मुद्दा असून डॉ विखे यांच्या स्पष्टीकरणानंतर विरोधक काय पावित्रा घेतात याची वाट पहावी लागणार आहे. या प्रकरणी आरोप प्रत्यारोपांच्य फैरी झडत असताना मात्र रस्ता वापरणाऱ्या वाटसरुच्या मनात हे ट्रम्प पुराण खरे की खोटे? की राजकीय धुराडा की मनोरंजन या विषयीचा संशय कल्लोळ कायम आहे.

### तर तुम्हाला कोणी नमस्कार सुद्धा घालणार नाही : डॉ. सुजय विखे

माझ्याकडे कोणतेही पद नाही, मी साधा ग्रामपंचायत सदस्यही नाही, कोणत्याही संवैधानिक पदावर नाही .माजी खासदार या नात्याने मला शासकीय विश्रामगृह वापरण्याची परवानगी आहे. मी ग्रामपंचायत सदस्य नाही, हे खरं आहे. मी कोणत्याही संवैधानिक पदावर नाही, हे ही मान्य करतो. मी येतो, लोक गोळा होतात आणि त्यांची कामे मी करतो. मी कधीही नगरपरिषद, तहसील किंवा प्रांत कार्यालयात जात नाही. मला माझा संवैधानिक अधिकार पूर्णपणे माहित आहे. परंतू माझ्या मित्रांना मी सांगतो मी बंद खोलीत बसतो म्हणून तुम्हाला कुणीतरी नमस्कार घालतो, मी जर का रस्त्यावर मंडप टाकून बसलो तर तुम्हाला नमस्कार सुद्धा घालायला कुणी उरणार नाही असे डॉ. विखे म्हणाले.

## टाकळीमानूरच्या एसएसबी जवानाचा भोपाळमध्ये गोळी झाडून आत्महत्या



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीमानूर** : पाथर्डी तालुक्यातील टाकळीमानूर येथील भूमिपुत्र आणि एसएसबी जवान संदीप खार्मटे (वय ३५) यांचा मध्य प्रदेशातील भोपाळ येथे कर्तव्यावर असताना गोळी लागून मृत्यू झाला. कमला नगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सीएसडी कॅम्प डेपोमध्ये ही घटना घडली. प्राथमिक तपासात त्यांनी सर्व्हिस रायफलने स्वतः वर गोळी झाडल्याचे समोर आले असून, पोलिसांनी आत्महत्येच्या दिशेने तपास सुरू केला आहे. घटनेची माहिती मिळताच कमला नगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. मृतदेह शवविच्छेदनासाठी हमिदिया रुग्णालयात पाठविण्यात आला असून, याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, सहकारी जवान, अधिकारी आणि कुटुंबीयांची चौकशी सुरू असून, शवविच्छेदन अहवाल व चिठ्ठीचे पूर्ण भाषांतर प्राप्त झाल्यानंतर मृत्यूमागील नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

### पत्नीशी शेवटचे संभाषण

संदीप खार्मटे यांनी मंगळवारी रात्री सुमारे दहा वाजता पत्नीशी शेवटचे संभाषण केले होते. आपण कर्तव्यावर असल्याचे त्यांनी पत्नीला सांगितले. त्यानंतर त्यांचा कुटुंबीयांशी संपर्क झाला नाही. बुधवारी पहाटे चारच्या सुमारास विभागाकडून संदीप यांच्या मृत्यूची माहिती कुटुंबीयांना देण्यात आली. अचानक आलेल्या या वृत्ताने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

### मराठीत सुसाईड नोट

तपासादरम्यान जवानाकडे मराठी भाषेत लिहिलेली चिठ्ठी पोलिसांना आढळली आहे. चिठ्ठीचा संपूर्ण मजकूर समजून घेण्यासाठी ती भाषांतरासाठी पाठविण्यात आली आहे. प्राथमिक माहितीनुसार, त्यात पत्नीची माफी मागत वैयक्तिक कारणांमुळे टोकाचे पाऊल उचलल्याचे नमूद असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## वाळू तस्करांकडून पोलीस कर्मचाऱ्याला शिवीगाळ, गुंन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : वाळू चोरी करून जात असलेल्या वाहनावर कारवाई करत असताना आरोपींनी पोलीस पथकाला मज्जाव करुन एका पोलिस कर्मचाऱ्याला शिवीगाळ, दमदाटी केली. तसेच सरकारी कामात अडथळा निर्माण केला. ही घटना राहुरी तालुक्यातील आरडगांव शिवारात दि. १५ ऑगस्ट रोजी रात्रीच्या दरम्यान घडली. दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री राहुरी पोलिस पथक गस्त घालीत होते. त्यावेळी ११२ नंबरवर आलेल्या कॉलवरुन पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक राहुरी तालुक्यातील आरडगांव शिवारात कारवाई करण्यासाठी गेले.

दरम्यान पोलिस पथक मानोरी रोडने वळणकडे जात असताना त्यांना आरडगांव शिवारातील वीट भट्टीजवळ एक वाहन वाळू चोरी करून जात होते. पथकाला पाहून चालकाने वाळूने भरलेले वाहन रोडच्या कडेला उभे करून तो अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला. त्यानंतर पोलिस पथक वाळूसह वाहन जप्त करून पोलीस ठाण्यात घेऊन जात असताना आरोपींनी मोटरसायकलवर येऊन पथकाची वाहने अडवीली. आणि पोलीस कर्मचारी चॉदभाई पठाण यांना म्हणाले कि, तु आमची वाळुची गाडी का पकडली, तु आमची वाळुची गाडी घेवुन जावु शकत नाही, असे म्हणाले. त्यानंतर आरोपींनी पठाण यांना शिवीगाळ करुन त्यांची कॉलर पकडली व धक्काबुक्की करुन मारहाण करण्याचा प्रयत्न केला. पठाण यांनी सदर घटना पोलिस ठाण्यात कळवील्याने आणखी एक पथक तेथे गेले असता आरोपी तेथुन पसार झाले. पोलिस हवालदार चालक चॉदभाई जैनुद्दिन पठाण यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात आरोपी विजय बाळासाहेब वाघ, संजय सुर्यकांत वाघ, सुर्यकांत बाळासाहेब वाघ, सर्व रा. तांदुळवाडी, ता. राहुरी, यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

## स्वातंत्र्यानंतर पहिल्यादांच अंतरवाली बु. येथे बससेवा सुरु

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव** : अंतरवाली बु. येथील विद्यार्थ्यासह ग्रामस्थांच्या दैनंदिन प्रवासाची गरज लक्षात घेवून चापडगाव - बेलगाव मार्गे अंतरवाली बु. या मार्गावर स्वातंत्र्यानंतर ८० वर्षानी प्रथमच नवीन बससेवा सुरु करण्यात आली. या बस सेवेचे अंतरवाली बुद्रुक येथील ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने स्वागत केले.

या गावातील बरेचसे विद्यार्थी शिक्षणासाठी चापडगाव विघालयात येतात. मात्र दळणवळणाची पुरेशी सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांना मोठया अंतराचा प्रवास पायी, सायकलवर करावा लागत होता.नवीन बस सेवेमुळे विद्यार्थ्यांची मोठी सोय होणार असून त्यांच्या नियमित शैक्षणिक प्रवासात सुरक्षित व सुलभ पर्याय उपलब्ध झाला आहे.तसेच गावातील ग्रामस्थांचे आठवडे बाजार, सहकारी, शासकीय बँकेचे व्यवहार चापडगाव येथेच होत असल्याने नागरिकांना मोठा फायदा व दिलासा मिळाला आहे. विशेषतः वृद्ध नागरिकांना ये-जा करण्याची मोठी सोय झाली आहे. गावात बस आल्याने प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

बस सेवेचे चालक बाबासाहेब ससे व वाहक प्रफुल्ल ताकमोडे यांचा चापडगाव विद्यालय व अंतरवाली बुद्रुक ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच ब्रह्मदेव आठरे,अमोल पठाडे,उपसरपंच जालिंदर कापसे,रामभाऊ कुलाळ, विश्वनाथ पालवे, संभाजी आठरे, सिताराम आठरे, माजी सरपंच राजेंद्र पोपळघट, रामेश्वर पालवे, भगवान उगले, नानासाहेब गायकवाड, रविंद्र पठाडे, शिवाजी काकडे, जनार्धन पठाडे,विजय पाथरकर, प्रल्हाद जाधव, दिनकर मोरे, लक्ष्मण कापसे, ज्ञानेश्वर तहकीक आदी मान्यवर उपस्थित होते.गावकऱ्यांची एकजूट, संस्था प्रशासन आणि विद्यार्थ्यांच्या सोयीचा ध्यास यामुळे चापडगाव मार्गे अंतरवाली बुद्रुक बस सेवेचे स्वप्न साकार झाले अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.आगार व्यवस्थापक अमोल कोतकर,वाहन नियंत्रण स्वप्निल गहाळ, राहूल शेळके या सर्वांचे ग्रामस्थांनी व शाळा प्रशासकांनी आभार मानले .

***बस सेवा सुरु करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष ॲड. डॉ.विद्याधर काकडे, जि.प. सदस्या हर्षदाताई काकडे, डॉ.लक्ष्मणराव बिटाळ, प्राचार्य संपत दसपुते, रामेश्वर पालवे, अंतरवाली बुद्रुकचे सरपंच, उपसरपंच, सोसायटी चेअरमन, व्हा.चेअरमन, ग्रामस्थ यांनी अथक परिश्रम घेतले.***

## जमीन घेण्यासाठी १० लाखांची मागणी

### सुनेला मारहाण, गुन्हा दाखल



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई / नेवासा** : जमिनीसाठी १० लाख रुपयांची मागणी करत सासरच्या १६ जणांनी विवाहितेला शारीरिक आणि मानसिक छळ केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रतिक्षा महेश दरंदले (वय २६, रा. खरवंडी रोड सोनई) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, तिचा विवाह ५ एप्रिल २०२४ रोजी महेश दरंदले यांच्याशी झाला होता. लग्नानंतर दोन महिन्यांपासून सासरचे लोक तिला हुंडा म्हणून १० लाख रुपये आणि जमीन घेण्यासाठी तगादा लावत होते. १० ऑक्टोबर २०२४ रोजी धमकी दिली तुझ्या माहेरच्यांनी पैसे द्यावेत, नाहीतर तुला माहेरी पाठवू अशी धमकी दिली. यानंतर वेळोवेळी मारहाण करून तिचा छळ केला. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी पुन्हा मारहाण करून घराबाहेर हाकलून दिले. पोलिसांनी महेश दरंदले, सासरे नामदेव दरंदले, सासू लता दरंदले यांच्यासह १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील अधिक तपास सोनई पोलीस करत आहे. दरम्यान महेश दरंदले हा पुणे येथे आयटी कंपनीत नोकरीला असल्याचे सांगून त्याच्याशी लग्न लावण्यात आले होते. नंतर अवघ्या काही महिन्यांत पुन्हा गावी येऊन शेती करत असल्याचा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर माहेरून आणखी शेती घेण्यासाठी पैसे आणावेत म्हणून छळ केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## नशामुक्त श्रीरामपूरसाठी पोलिसांचा पुढाकार

### आज भव्य जनजागृती रॅली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**श्रीरामपूर** : शहरासह परिसरात वाढत असलेल्या अंमली पदार्थांच्या सेवनाला आळा घालण्यासाठी तसेच युवकांमध्ये व्यसनाच्या दुष्परिणामांबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने श्रीरामपूर पोलिसांकडून उद्या, शुक्रवार दि. २१ ऑगस्ट रोजी भव्य अंमली पदार्थविरोधी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. 'नशामुक्त अभियान' अंतर्गत होणाऱ्या या रॅलीतून 'ड्रग फ्री श्रीरामपूर' चा संदेश देण्यात येणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी केले आहे. रॅलीची सुरुवात उद्या सकाळी साडेसात वाजता आर.एन.बी. महाविद्यालयाच्या क्रीडांगणातून होणार आहे.

या उपक्रमास नगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे, जिल्हाधिकारी पंकज आशिया, जिल्हा पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. व्यसनमुक्तीचा संदेश समाजाच्या विविध स्तरांपर्यंत पोहोचवून अंमली पदार्थांविरोधातील लढ्याला व्यापक लोकसहभाग मिळवून देण्याचा पोलिस प्रशासनाचा प्रयत्न आहे. शहर व परिसरातील शाळा-महाविद्यालयांमधील विद्यार्थी या रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

त्याचबरोबर सामाजिक व शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संघटना, महिला मंडळे, विविध क्षेत्रांतील मान्यवर, सुजाण नागरिक तसेच शासकीय व निमशासकीय कार्यालयांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांनाही सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

रॅलीसाठी पांढरा टी-शर्ट, स्पोर्ट्स पॅन्ट व स्पोर्ट्स शूज असा ड्रेसकोड ठेवण्यात आला आहे. श्रीरामपूरला व्यसनमुक्त करण्याच्या या सामाजिक अभियानाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन वेळेत उपस्थित राहावे आणि रॅली यशस्वी करावी, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

## टाकळीभान ग्रामसभा गदारोळात

### विकासाच्या मुद्द्यांऐवजी आरोप-प्रत्यारोपांचीच चर्चा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान ग्रामपंचायतीची ग्रामसभा बुधवार दि. १९ ऑगस्ट रोजी उपसरपंच कान्हा खंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. ग्रामपंचायतीच्या विद्यमान सदस्य मंडळाची ही शेवटची ग्रामसभा असल्याने गावातील विकासकामांवर सविस्तर चर्चा होईल, अशी अपेक्षा ग्रामस्थांना होती.

मात्र रेशन, बसस्थानक, यात्रा तसेच विविध आरोप-प्रत्यारोपांवरून झालेल्या गदारोळामुळे विकासाचे प्रश्न बाजूला पडले. ग्रामसेवक भिंगारदे यांनी अहवाल वाचन सुरू करताच काही ग्रामस्थांनी व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर भास्करराव कोकणे यांनी गेल्या पाच वर्षांच्या कारभारावर टीका करत विकासकामांऐवजी गलिच्छ राजकारण झाल्याचा आरोप केला. अनिल बोडखे यांनी अन्नसुरक्षा योजनेतील नावांच्या समावेशाबाबत प्रश्न उपस्थित केला. यावेळी त्यांची उपसरपंच खंडागळे यांच्याशी शाब्दिक बाचाबाची झाली. बापूसाहेब शिंदे यांनी अतिक्रमण नियमानुकूल करण्यासह घरकुलांचा प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी केली.

रामभाऊ आरगडे यांनी व्यापाऱ्यांना विनाकारण त्रास देऊ नये, असे मत मांडले. संजय रणनवरे यांनी बसस्थानकाचा प्रश्न सोडविण्यासाठी वरिष्ठ नेत्यांकडे पाठपुरावा करण्याचा इशारा देत बसस्थानक परिसरात महिलांसाठी स्वच्छतागृह उभारण्याची मागणी केली. सुप्रिया धुमाळ यांनी गावातील मुली व महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित केला. तसेच यात्रा, ऑर्केस्ट्रा कार्यक्रम आणि ग्रामपंचायतीच्या जागेबाबत प्रश्न उपस्थित होताच सभेत मोठा गदारोळ झाला.

यात्रा समितीचे निर्णय ग्रामपंचायतीशी संबंधित नसल्याचे उपसरपंचांनी स्पष्ट केले. सुमारे तीन तास चाललेल्या या ग्रामसभेतील तब्बल अडीच तास आरोप-प्रत्यारोप आणि शाब्दिक खडाजंगीमध्ये गेले. त्यामुळे अनेक ग्रामस्थांना आपले प्रश्न मांडण्याची संधी मिळाली नाही. गावातील ज्येष्ठ नेत्यांचीही सभेला अपेक्षित उपस्थिती नव्हती. त्यामुळे विकासकामांवरील चर्चा न होता गदारोळातच ग्रामसभा गुंडाळल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये होती.

टाकळीभान गावांमध्ये मागील पाच वर्षांमध्ये कोणताही विकास कामे झाली नसून सदस्य बॉडी व ग्रामसेवक हेच मालामाल झाले आहेत. गावचा विकास न करता गावाला भकास करणाऱ्या जुन्या लोकांना परत संधी देऊ नका ... भास्करराव कोकणे
(माजी उपसरपंच, टाकळीभान)

### सफाई कामगाराचा अनोखा निषेध; ग्रामसभेपुढे टाकले मेलेले डुक्कर

टाकळीभान ग्रामपंचायतीतील सफाई कामगार सावळेराम गाढे यांनी पगारवाढ होत नाही. तसेच मोठ्या ग्रामपंचायतीच्या तुलनेत अत्यंत कमी सफाई कामगार असल्याने कामाचा वाढता ताण असल्याचा निषेध अनोख्या पद्धतीने नोंदविला. त्यांनी मेलेले डुक्कर ग्रामसभेपुढे आणून टाकले आणि काही वेळाने ते पुन्हा गोणीत भरून नेले. या प्रकारामुळे ग्रामसभेतील उपस्थित ग्रामस्थ अवाक झाले. सफाई कामगारांकडून गावातील अत्यंत महत्त्वाचे स्वच्छतेचे काम करून घेतले जात असताना त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचे या घटनेतून समोर आले. ग्रामपंचायतीच्या कामगारांप्रती असलेल्या असंवेदनशील भूमिकेबद्दल ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली.

## संगमनेरच्या स्वतंत्र RTO कार्यालयाच्या स्वप्नाला श्रीरामपूरकडून 'खो'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : संगमनेर येथे स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) सुरू करण्याच्या अनेक वर्षांपासूनच्या मागणीला सध्या मोठा धक्का बसला आहे. संगमनेरच्या स्वतंत्र RTO कार्यालयाच्या प्रस्तावासंदर्भात श्रीरामपूर येथील परिवहन अधिकाऱ्यांनी नकारात्मक अहवाल शासनाकडे सादर केल्याने या मागणीच्या प्रक्रियेला तात्पुरता 'ब्रेक' लागला आहे. शासकीय निकषांचा वेगळ्या पद्धतीने अर्थ लावून हा अहवाल तयार करण्यात आल्याची चर्चा संगमनेर परिसरात सुरू आहे.

संगमनेर शहरासह तालुक्यातील तसेच पठार भागातील नागरिकांना वाहन नोंदणी, परवाना, वाहन हस्तांतरण, फिटनेस, कर भरणा आणि इतर परिवहनविषयक कामांसाठी श्रीरामपूर येथे जावे लागते. यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम मोठ्या प्रमाणात खर्च होतात. संगमनेर हे महत्त्वाचे व्यापारी व प्रशासकीय केंद्र असून परिसरातील वाहनांची संख्या आणि परिवहनविषयक कामकाजाचे प्रमाणही मोठे आहे. त्यामुळे येथे स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्याची मागणी अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे.

या मागणीच्या अनुषंगाने स्वतंत्र RTO कार्यालयासाठी प्रस्ताव शासनस्तरावर पाठविण्यात आला होता. मात्र, श्रीरामपूरच्या परिवहन अधिकाऱ्यांनी प्रस्तावास अनुकूल भूमिका न घेता नकारात्मक अहवाल दिल्याने प्रस्तावाच्या पुढील प्रक्रियेसमोर अडथळा निर्माण झाला आहे.

दरम्यान, या अहवालामुळे संगमनेरकरांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, स्वतंत्र कार्यालयासाठी शासनाने वस्तुनिष्ठ निकषांवर फेरविचार करावा, अशी मागणी होत आहे. संगमनेरची भौगोलिक व्याप्ती, वाढती वाहनसंख्या आणि नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन स्वतंत्र RTO कार्यालयाचा प्रस्ताव पुन्हा गांभीर्याने विचारात घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.